दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -३४६ | मंगळवार,दि.१९ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-346 | Tuesday, Dt.19 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## विजेचा धक्का लागून शेतकरी ठार

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरडेवाडी शिवारातील घाटेवस्ती येथे राहणारे शेतकरी बाबासाहेब रावसाहेब राख,वय ५५ वर्षे यांना सोमवारी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान विजेचा धक्का बसला.जखमी अवस्थेत त्यांना केज येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी घेवून गेले असता डॉक्टरांनी त्यांची तपासणी करुन त्यांना मयत घोषित केले.सोमवारी दि.१८ आगष्ट रोजी सकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान कोरडेवाडी शिवारातील घाटेवस्ती येथे राहणाऱ्या बाबासाहेब रावसाहेब राख,वय ५५ वर्षे यांना सोमवारी दि.१८ आगष्ट रोजी राहत्या घरी विजेचा धक्का लागून ते जखमी झालेहोते.त्यांना पुढील उपचारासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घेवून गेल्या नंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी करुन त्यांना मयत झाल्याचे घोषित केले.बाबासाहेब राख यांच्या पश्च्यात पत्नी, १ मुलगा असा परिवार असून सोमवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर कोरडेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्य संस्कार करण्यात आले.

# जीवाची पर्वा न करता पोलिसांनी पुरात वाहून जाणाऱ्या तिघांचे जीव वाचवले

## आमदार धनंजय मुंडे यांची तत्परता, रात्रीतून हलवली यंत्रणा !

### सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे व पथकाचे कौतुक

तीन तरुणांचे प्राण वाचविण्यात यश आल्याने पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे व पथकाचे कौतुक व अभिनंदन केले आहे.






### प्रशासन अलर्टवर, नागरिकांनी सतर्क रहावे - धनंजय मुंडे

दरम्यान परळी वैद्यनाथ मतदारसंघांत परळी शहरासह विविध गावातील अनेक नद्यांना पूर आले असून प्रशासन २४ तास अलर्ट मोडवर आहे. नागरिकांनी नदीकाठी जाणे टाळावे, नदी काठी राहणाऱ्या नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी तसेच कोणतीही आपत्ती उद्भवत असल्यास तातडीने सुरक्षित स्थळी जावे, कुठल्याही पुलावरून पानी वाहत असल्यास त्यातून वाहने घालू नयेत, तसेच आपत्ती काळात माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

बीड /प्रतिनिधी

दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे रेवली फाटा येथील अपघातग्रस्त ठिकाणी मदतकार्य करत असताना, मौजे डिग्रस येथील ग्रामस्थांकडून सपोनि दहिफळे यांना माहिती प्राप्त झाली की डिग्रस येथील दोन तरुण व पुणे येथील दोन तरुण असे चार युवक परळी येथे लग्नसमारंभ आटोपून डिग्रसकडे परतत असताना रस्त्यावरील पुलावरून पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांची मारुती सुझुकी बलेनो कार वाहत्या पाण्यात वाहून गेली आहे. त्याबाबत त्यातील एका युवकाने घटनेबाबत मोबाईलवरून माहिती दिली.

त्यावरुन सपोनि गोरकनाथ यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना माहिती देऊन त्यांचे मार्गदर्शनाखाली स्टाफसह घटनास्थळी धाव घेतली तसेच घटनेबाबत मा. पोलीस अधीक्षक काँवत सर यांना माहिती दिली असता त्यांनी उपलब्ध संसाधनांचा वापर करून तरुणांचे प्राण वाचविण्याच्या सूचना दिल्या.

यानंतर घटनास्थळ निश्चित करण्यासाठी ममदापूर, कवडगाव हुडा येथील दत्तात्रय गव्हाणे, दिलीप राठोड, कवडगाव साबळा, कवडगाव घोडा येथील पांडुरंग फपाळ, आचार्य टाकळी येथील नागरिक यांच्याशी संपर्क साधून नदीकिनारी जाऊन आवाज

(उर्वरीत पान २ वर)

### धनंजय मुंडे यांनी रात्रीतून हलवली यंत्रणा

या घटनेची माहिती स्थानिकांनी तत्काळ या भागाचे आमदार धनंजय मुंडे यांना कळवली. माहिती मिळताच त्यांनी तात्काळ प्रशासकीय यंत्रणांना सज्ज करून बचाव कार्याला वेग आणला. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, उपविभागीय पोलिस अधिकारी, सिरसाळा पोलीस ठाण्याचे सपोनी गोरक्षनाथ दहिफळे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, जगमीत्र कार्यालयाचे समन्वयक बाबुराव रुपनर हे बचाव पथकांना घेऊन मध्यरात्री घटना स्थळी दाखल झाले होते. पाण्याचा प्रवाह अत्यंत जास्त असल्याने बचाव कार्याला अडथळे येत होते, त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या मार्फत बीडचे जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या कार्यालयास संपर्क करून एन डी आर एफ च्या पथकास पाचारण करण्यात आले. हे पथकही तातडीने रवाना झाले.

## नियतीचा खेळ आणि गरिबीची जोड




बीड /प्रतिनिधी

जीवन जगणे आणि वेळ काढणे तश्या खूप भिन्न गोष्टी. जेव्हा पाऊस पडतो तर एक आनंद सगळीकडे असतो. कोणी पावसात गरम भजी खाण्याचे विचार करतो तर कोणी कडक गरम चहा पिण्याचा. पण तो दिवस जरा वेगळा वाटला... कारण त्या रात्री खूप पाऊस चालू होता... आणि जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण जो नेहमी गजबलेला परिसर छत्रपती शिवाजी महाराज चौक. त्या ठिकाणी एक आजी जवळपास सत्तर वर्षांची आपल जीवन पावसापासून बचावताना दिसली.

छत्री धरून कशीबशी शरीर झाकण्याचा प्रयत्न करत होती. किती तफावत होती एकीकडे ज्यांना घर-दार सर्व असत तर दुसरीकडे असे लोक जीवनाची प्रत्येक घटका मोजताना दिसतात किती मन हेलावून टाकणारी परिस्थिती आहे. एकूणच वरील परिस्थिती बघता त्या वर्दळ असणाऱ्या जागेवरून अनेक नागरिक जात होते पण एकालाही वाटले नाही की, ती एक स्त्री आहे, तिला कोणी हात द्यावा ? रात्रीची उशीराची वेळ आहे.हा प्रश्न का कोणालाच पडला नसेल ? लाडकी बहीण केवळ नावालाच आहेत का ? ही देखील कोणाची बहीण असेलच. मग तिच्यासाठी का शासन प्रशासन तरतूद करत नाही. ? शासनाच्या योजनांमधून साठ वर्षांची अट येते. कोणाला मदत करण्याची इच्छा ही असेल तर ते करू शकत नाही. ही नक्कीच तिची अवहेलना नाही का ? वृद्धाश्रम भरपूर आहेत पण ते केवळ नावाला. त्याकडे शासन प्रशासन कितपत लक्ष देतात. असे अनेक प्रश्न या आजी त्या रात्रीच्या प्रसंगातून सांगून गेल्या.सरते शेवटी आपला देश महासत्ता होण्याकडे वाटचाल करतोय पण दररोज असे गरिबीने खितपत पडलेले लोक आपल्याला दिसतात. तर ही गरिबी यांना सोबतच घेऊन जाईल का ? असे अनुत्तरित प्रश्न राहून जातात.

संपर्क: ९७६४२२३५३४

# संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना जामीन मिळणार ? ३० ऑगस्टला फैसला

## आरोपींना कोणताही दिलासा न देण्याची फिर्यादी पक्षाची कोर्टाला विनंती

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज विशेष मकोका कोर्टात सुनावणी झाली. त्यात आरोपींच्या वकिलांनी आपल्या अशिलांचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत त्यांना जामीन मंजूर करण्याची विनंती केली. पण फिर्यादी पक्षाने हे अत्यंत गंभीर प्रकरण असल्याचे नमूद करत आरोपींना कोणताही दिलासा देण्यास कडाडून विरोध केला. त्यामुळे कोर्टाने आपला फैसला ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. आता या प्रकरणातील आरोपींना जामीन मिळणार की ते तुरुंगातच खितपत राहणार याचा फैसला या महिन्याच्या शेवटी होणार आहे.

संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू समजल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक केली होती. या सर्वांनी आता जामिनीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या याचिकेवर आज विशेष मकोका कोर्टात सलग ३ तास सुनावणी



झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलाने १ तास ४५ मिनिटे युक्तिवाद करत जामिनाची मागणी केली. विशेषतः वाल्मीक कराड याला अटक करताना कोणतेही कारण देण्यात आले नव्हते, अशी बाबही त्यांनी यावेळी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली.


त्यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जोरदार हरकत घेतली. तसेच आवादा कंपनीचे कर्मचारी सुनील शिंदे यांनी रेकॉर्ड केलेल्या फोन कॉलची तारीख चुकीची असल्याचा आरोपींचा युक्तिवादही त्यांनी सीडीआर दाखल करून जोरकसपणे फेटाळून लावला. सीडीआरनुसार वाल्मीक कराडने त्या दिवशी सुनील शिंदे यांना फोन केला होता. त्याची नोंद आहे. या संभाषणाशी संबंधित पुरावे योग्यवेळी कोर्टात सादर केले जातील, असे ते म्हणाले.

(उर्वरीत पान २ वर)

# तुलसी कॉलेजने आयोजित केलेला बीड जिल्ह्यातील पहिला बालमॉडेल्सच्या रॅम्पवॉकने उजळला 'चॅम्प ऑन रॅम्प' फॅशन शो..!





### क्रिएटिव्हिटीचा विचार व्यक्तीला सक्षम आणि यशस्वी बनवतो - उपसंचालक नितिका विलास

बीड /प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचालित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो 'चॅम्प ऑन रॅम्प - सीझन १' हा भव्य सोहळा रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी रामकृष्ण लॉन, कॅनॉल रोड, बीड येथे उत्साहात पार पडला.उद्घाटन प्रसंगी आयकर विभागाच्या उपसंचालिका नितिका विलास यांनी, क्रिएटिव्हिटी ही केवळ पदवी नसून एक विचारप्रक्रिया आहे. हा विचार आपण कोणत्याही क्षेत्रात उतरवू शकतो आणि हाच क्रिएटिव्हिटीचा विचार व्यक्तीला सक्षम व यशस्वी होण्यास मदत करतो, असे प्रतिपादन केले.

(उर्वरीत पान २ वर)




# वाण धरण पूर्ण क्षमतेने भरले

## परळीसह अनेक गावांचा पाणी प्रश्न मिटणार

परळी / प्रतिनिधी

मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसाने परळी शहराला पाणी पुरवठा करणारे तालुक्यातील नागापूर येथील वाण मध्यम प्रकल्प लवकरच १०० टक्के भरले असून पाणी परळीकरांवरील जलसंकट दूर होऊन परळीकरांची पाण्यासाठीची वणवण मिटली आहे.श्रावण महिना, सणासुदीचा काळ असल्याने नगर परिषदेमार्फत परळीकरांना दररोज पाणी पुरवठा करावा अशी मागणी जोर धरत आहे.

१९६६ मध्ये बांधकाम पूर्ण झालेल्या परळी तालुक्यातील नागापूर वाण धरणाची एकूण पाणीसाठा क्षमता १९.७२ द.ल.घ.मी एवढा आहे. धरणातील लाभक्षेत्रातील गावांमध्ये परळी तालुक्यातील नागापूर, माळहिवरा, मांडेखेल, तळेगाव, तडोळी, भिलेगाव, परचुंडी, लिंबूटा यासह इतर लहानमोठ्या १६ गावांचा समावेश आहे. परळी शहर व तालुक्यात मागील काही दिवसापासून समाधानकारक पाऊस झाल्याने परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नागापूरच्या वाण धरण दि १८ ऑगस्ट रोजी सांडव्यापर्यंत पूर्ण भरत आले असून पाण्याची आवक अद्याप देखील सुरू असल्याने कोणत्याही क्षणी पाणी सांडव्यावरून वाहू लागणार आहे.. उन्हाळ्यात धरणाची पाणी पातळी घटल्याने परळीनगर परिषदेने शहराला चार-पाच दिवसाआड पाणीपुरवठा चालू होता मात्र धरण ऐन श्रावण महिन्यात पूर्ण क्षमतेने भरत आल्याने नगर परिषदेने दररोज अथवा दिवसाआड पाणी पुरवठा करावा अशी मागणी परळीकर करत आहेत. बारा

(उर्वरीत पान २ वर)





## संपादकीय

### महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची घटती संख्या आणि उपस्थिती... एक चिंतन

उच्च शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वाचे अंग आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत भारतात उच्च शिक्षण संस्थांची संख्या वाढली असली तरी विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि सहभाग कमी होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. ज्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. या लेखात विद्यार्थ्यांची घटती संख्या आणि वर्गातील उपस्थिती कमी होण्यामागील कारणे, परिस्थिती आणि उपाय यांचे सखोल विश्लेषण केले आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची घटती संख्या..

भारतामध्ये उच्च शिक्षण संस्थांची संख्या २०१४-१५ मध्ये ५१,५३४ होती, जी २०२२-२३ मध्ये ५८,६४३ वर पोहोचली आहे, म्हणजेच १३.८% वाढ झाली आहे. तथापि, विद्यार्थ्यांची संख्या अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. उदाहरणार्थ, १८-२३ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठीची ग्रॉस एनरोलमेंट रेशो (ऋएठ) २३.७% वरून २८.४% वर वाढली आहे, तरीही ५०% चा उद्दिष्ट गाठण्यासाठी अजूनही मोठा अंतर आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी भौगोलिक अडचणी, कमी सुविधा आणि आर्थिक कारणांमुळे महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणे कठीण होते. शहरी भागातही महागाई, वाहतूक समस्या आणि इतर सामाजिक अडचणी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा आणतात.

कौटुंबिक जबाबदाऱ्या, विशेषतः मुलींच्या बाबतीत, शिक्षणापेक्षा घरकाम, शेती आणि इतर कौटुंबिक कामे महत्त्वाची ठरतात. यामुळे मुलींच्या उच्च शिक्षणात सहभाग कमी होतो. राजकीय आणि प्रशासनिक कारणे देखील महत्त्वाची आहेत. शिक्षण धोरणांची अपर्याप्त माहिती, महाविद्यालयीन व्यवस्थापनातील कमतरता, अनियमित शैक्षणिक कार्यक्रम, इन्फ्रास्ट्रक्चरची कमतरता यामुळे विद्यार्थी उदासीन होतात.उपाय म्हणून शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांना वर्गात नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. डिजिटल आणि पारंपारिक शिक्षण यांचा समन्वय, आर्थिक सहाय्य, करिअर मार्गदर्शन, मानसिक स्वास्थ्याचे प्रशिक्षण आणि सर्जनशील प्रोत्साहन यासारखी उपाययोजना प्रभावी ठरू शकतात.

वर्गातील कमी उपस्थिती...

वर्गातील नियमित उपस्थिती हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि कौशल्य विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, आज अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी वर्गात कमी येत आहेत. ही समस्या विद्यार्थ्यांच्या सवयींपेक्षा जास्त सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, तांत्रिक आणि मानसिक कारणांमुळे आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी भौगोलिक अडथळे मोठ्या प्रमाणात आहेत. महाविद्यालयापर्यंतची किलस, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा यासारख्या ऋतूंचा प्रत्यक्ष उपस्थितीवर परिणाम होतो. काही विद्यार्थी घरकामे, शेतीची कामे किंवा घरातील प्रश्न यामुळं वर्गात येऊ शकत नाहीत. शहरी भागातील विद्यार्थी जरी जवळ राहत असले तरी सोशल मीडिया, गेमिंग, पार्ट-टाइम कामे यामुळे नियमित उपस्थिती कमी होते. सामाजिक आणि कौटुंबिक कारणेही महत्त्वाची आहेत. काही कुटुंबांमध्ये मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रेरणा आणि सहकार्य मर्यादित असते. मुलींच्या बाबतीत विशेषतः, घरकामे, लहान भावंडांची काळजी किंवा कौटुंबिक अपेक्षा यामुळे वर्गात उपस्थित राहणे कमी होते. बदलती सामाजिक परिस्थिती आणि अपेक्षा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर थेट परिणाम करतात.तंत्रज्ञानाचा वाढता वापर वर्गातील उपस्थिती कमी करण्यास कारणीभूत ठरतो. ऑनलाईन लेक्चर्स, व्हिडिओ कोर्सेस आणि इंटरनेटवरील माहिती सहज उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात येण्याची गरज कमी समजतात. प्रत्यक्ष शिक्षकांशी संवाद, समूह चर्चा, प्रायोगिक अनुभव आणि कौशल्यशीर विषयक प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक आहे, जी गमावली जाते.उपाय म्हणून महाविद्यालयांनी वर्गातील उपस्थिती वाढवण्यासाठी सर्जनशील उपाययोजना राबवाव्यात. डिजिटल आणि पारंपारिक शिक्षणाची संतुलित पद्धत राबवणे, विद्यार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक अडचणी समजून मार्गदर्शन करणे, मानसिक स्वास्थ्य आणि करिअर मार्गदर्शन देणे यामुळे विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती सुधारता येईल.

एकुणच, उच्च शिक्षण हा व्यक्तिमत्व विकास, ज्ञान संपादन आणि सामाजिक योगदानाचा महत्त्वाचा स्तंभ आहे. विद्यार्थ्यांची घटती संख्या आणि वर्गातील कमी उपस्थिती ही चिंताजनक बाब आहे,

# रेडेकर गुरुजींचे ब्रीद होते निष्ठेने काम म्हणजे यशाचा मार्ग - देविदास धस

## भक्ती थोडी करा पण शुद्ध भावनेने करा - ह.भ.प.निळकंठ तावरे

आष्टी (प्रतिनिधी)

गेल्या अनेक वर्षापासून बेलेश्वर मंदिर या ठिकाणी तिसऱ्या सोमवारी होणारा उत्सव त्यानिमित्त ह. भ. प. भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे संस्थापक अध्यक्ष श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ वारकरी शिक्षण संस्था यांची सुंदर अशी कीर्तन सेवा झाली. शिव भोळा चक्रवर्ती त्याचे पाय माझे चित्ती या अभंगावर निरूपण करत असताना भगवंताचं नामस्मरण केल्यानंतर मानवी जीवनामध्ये काम, क्रोध, मध, मत्सर, अहंकार हे जे विकार आहेत ते संपूर्ण विकार भगवंताच्या नामस्मरणाने शुद्ध अंतकरणाने केलेल्या सेवेतून विकार नष्ट होतात म्हणून जीवन जगत असताना शुद्ध अंतकरणाने भक्ती करा. भक्ती थोडी करा पण शुद्ध भावनेने करा. मानवी जीवन परोपकारासाठी मिळालेलं आहे. भागवत प्राप्तीसाठी मिळालेलं आहे. भगवंत प्राप्तीमध्येच मानवी जीवनाची इती कर्तव्यता आहे, त्याकरता धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ यासंदर्विहाने मिळवता येतात म्हणून माणसाने कोणाला त्रास होईल आपल्यापासून कोणाचं वाईट होईल असं वागू नये.

सामान्य घटक पक्षाचे आहेत, गोरगरीब लोक जे आहेत त्यांना मदत करणे हाच मोठा धर्म आहे. संतांनी देखील आपल्याजवळ जे होतं ते समाजाच्या उपयोगाकरिताच खर्च केलं म्हणून प्रत्येकाने आपल्याजवळ ज्या चांगल्या गोष्टी आहेत मग धन असेल, ज्ञान असेल हे समाजाकरिता काही अंशी तरी खर्च करावे. संतांनी स्वतः अनुभव घेऊन स्वतः करून जगाला ते करायला सांगितले आहे. म्हणून आपण संतांनी सांगितलेल्या



मार्गाने जाऊ. यामुळे नक्कीच आपल्याला भगवान परमात्मा प्राप्त होईल अशा प्रकारचे प्रतिपादन आष्टी येथील बेलेश्वर मंदिर समस्त रेडेकर कंपनी पंचक्रोशीतील सर्व मंडळी सुंदर असं मंदिर भव्य अशा प्रांगणामध्ये कार्यक्रम प्रसंगी ह. भ. प. भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे बोलत होते.

त्यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून पुरोपकारी जीवन जगा कोणालाही त्रास देऊ नका. आळंदी - पंढरीची वारी करा. आई - वडिलांची सेवा मनाने करा. होईल तेवढा परोपकार जीवनामध्ये करा व भगवंत कृपा संपादन करा असेही प्रतिपादन ह. भ. प. भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे यांनी केले. याप्रसंगी प्रास्ताविक पत्रकार शरद रेडेकर यांनी केले.

यावेळी देविदास आबा धस म्हणाले की, तवलवाडी रोड वरील बेलेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित भंडारा कार्यक्रम प्रसंगी उपस्थित राहुन भाविक भक्तांना समाजाचे निती मूल्य जपा तसेच आई - वडिलांचा सांभाळ करा. मुलींनी आपल्या आई - वडिलांची शर्मिने मान झुकवून देऊ नका असे वागू नका. असा संदेश दिला. तसेच रेडेकर परीवारातील जेष्ठ स्व. माजी जि. प. सदस्य रेडेकर गुरुजी यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. गुरुजींचे ब्रीद वाक्य होते निष्ठेने काम म्हणजे यशाचा मार्ग याप्रमाणे वागले. त्यामुळेच त्यांचे नाव निघत आहे. या पुढच्या पिढीने देखील त्यांच्या नीती मूल्याचे पालन करून त्यांनी सांगून दिलेल्या निष्ठेने काम म्हणजे यशाचा मार्ग या ब्रीद वाक्याचे पालन करून समाजात वागावे असा देखील सल्ला रेडेकर परिवारातील इतर सदस्यांना दिला. रेडेकर परिवारातील माता माऊलींचे दर्शन घेतले. कीर्तनाला साथ करणारे सुदाम महाराज बोराडे, विठ्ठल महाराज तावरे श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ संस्थेतील सर्व विद्यार्थी, मृदुंगाचार्य प्रशांत महाराज ससाणे आदी सर्वच मंडळी उपस्थित होते. यावेळी आजिनाथ सानप, बलभीम रेडेकर, रेडेकर सर, विष्णु रेडेकर, ज्योतिबा रेडेकर, रामकाका मुळे, रामदास मुळे, राजु मुळे, रावसाहेब देशमुख

## श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अंबाजोगाईत महाआरती, किर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन

भाविक भक्तांनी लाभ घ्यावा - मधुकर सुरवसे यांचे आवाहन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री संत सेना महाराज यांच्या ६२६ व्या पुण्यतिथीनिमित्त अंबाजोगाई येथे बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्रींचा अभिषेक व महापुजा, महाआरती, किर्तन, भक्तीगीत गायन आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्त, सर्व समाज बांधवांनी पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मधुकर सुरवसे यांनी केले आहे.



मधुकर सुरवसे
(तालुकाध्यक्ष, राष्ट्रीय नाभिक एकता महासंघ, अंबाजोगाई)

शहरातील श्री संत सेना महाराज व श्री संत नरहरी महाराज मंदिर, मुकुंदराज रोड, अंबाजोगाई येथे बुधवार, दि.२० ऑगस्ट रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार सकाळी ७ ते ९ वाजता या वेळेत श्रीहरी (मामा) गवळी व माणिकराव (मामा) राऊत, विष्णु कचरे, पांडुरंग कचरे, विष्णु शिंदे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा होईल. सकाळी १० ते १२ वाजता या वेळेत ह.भ.प.जनार्धन महाराज चलवाड (श्री.जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम, औरंगपुर) यांचे किर्तन होईल. किर्तन व भजनाचे मानकरी प्रा.विजयकुमार बिदरकर, भिमराव बाबुराव कचरे हे आहेत. त्यानंतर दुपारी १२ ते दुपारी २ वाजता या वेळेत सुप्रसिद्ध गायक सुभाष शेप यांचा भक्तीगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री संत सेना महाराज प्रतिष्ठाण, राष्ट्रीय नाभिक एकता महासंघ, अंबाजोगाई आणि मधुकर सुरवसे, जिवराज मोरे, भिमराव कचरे, परमेश्वर गवळी, संतोष गवळी, अजिंक्य राऊत, अभिनय सुरवसे, राजकुमार जाधव, डॉ.केशवराव राऊत, संभाजी राऊत, नवनाथ राऊत, अभिराज गवळी, नरसिंग वाटकर, गोविंद (दादा) चोपडे, कविराज (दादा) कचरे आणि कारागीर युनियनचे अध्यक्ष माधव कांबळे यांच्यासह सर्व समाज बांधवांनी पुढाकार घेतला आहे.

# श्रीम.अश्विनी परकाळेचा प्रवास तरुण पिढीसाठी प्रेरणादायी - आ.प्रा.राम शिंदे

मा.आ.साहेबराव दरेकर,मा.आ.बाळासाहेब आजबे,सागर धस यांची प्रमुख उपस्थिती

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागात जि. प. शाळेत शिक्षण घेऊन गावाचे, जिल्ह्याचे व राज्याचे नाव यशाच्या शिखरावर पोहोच करणाऱ्या पिंपरी घुमरी सारख्या खेड्यातील मुलीने स्वतः ४० टक्के अंध असतानाही केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेमध्ये यश मिळवून भारतीय वन खात्यामध्ये सन्मानाचे पद मिळवले आहे. हा त्यांचा प्रवास तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती आ. प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केले.

आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील श्रीम. अश्विनी देवराव परकाळे यांनी यूपीएससी परीक्षेमध्ये इंडियन फॉरेस्ट सर्विसमध्ये क्लास वन पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार आयोजित करण्यात आला. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत



होते. यावेळी माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. बाळासाहेब आजबे, तहसीलदार श्रीम. वैशाली पाटील, न्यायमूर्ती श्रीम. अनुराधा पांडुळे, सागर धस, हनुमंत थोरवे, वैभवी देशमुख, धनंजय देशमुख, अंबादास पिसाळ, लक्ष्मण परकाळे, अनिल पांडुळे, शिवाजी पांडुळे, काकासाहेब तापकीर, नानासाहेब जाधव, रावसाहेब खिळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गावातील गौरी आत्माराम पांडुळे (एमबीबीएस उत्तीर्ण), समीक्षा दिलीप उढाणे (एमबीबीएस उत्तीर्ण), आरती आत्माराम पांडुळे (लिपिक नेवासा न्यायालय), सोपान अंशीराम नरवडे (पुरवठा निरीक्षक अधिकारी परभणी), सुग्रीव साहेबराव परकाळे (मुंबई पोलीस), जालिंदर दत्तू शिंदे (अहिल्यानगर पोलीस), राहुल तात्याभाऊ घुमरे (शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रवेश), आकाश महादेव पांडुळे (विक्रीकर प्रशासकीय अधिकारी) झाल्याबद्दल मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार झाला. यावेळी माजी आ.साहेबराव दरेकर, माजी आ.बाळासाहेब आजबे, सागर धस आदींनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन निलेश दिवटे, अशोक उढाणे, अमोल जगताप यांनी केले.

जि. प. शाळा सर्वोत्तम - परकाळे

प्रास्ताविकात अश्विनी परकाळे म्हणाल्या की, मी जीवनात अनेक आव्हाने स्वीकारून संघर्षमय प्रवास करून इथपर्यंत पोहोचले आहे. माझ्या दृष्टीदोषामुळे वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळाला नसल्याची खंत मनात न ठेवता पुढे आपल्याला काय करता येईल यासाठी धडपड करून यूपीएससी मध्ये यश मिळवले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा या सर्वोत्तम असून माझे शिक्षण हे जिल्हा परिषदेच्या शाळेतच झाल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

## पान १ वरून...

**जीवाची पर्वा न...**

देण्याची विनंती करण्यात आली. दरम्यान शासकीय वाहनावरील चालक सफौ./१५५२ धनराज सोडगीर हे शासकीय वाहनावरील झ- ड्रींशा वर सतत रपर्पीपलशाशपींी करून सदर तरुणांना धीर देत होते. त्यानुसार ग्रामस्थांनी दिलेल्या आवाजास प्रतिसाद मिळाल्याने मौजे कवडगाव हुडा येथील नदीकिनारी एक युवक असल्याची माहिती सपोनि दहिफळे यांना प्राप्त झाली.

सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गोरकनाथ दहिफळे, -ीळ १५५२ धनराज सोडगीर, झल १५९८ उत्तरेश्वर केदार यांनी आजूबाजूच्या ग्रामस्थांच्या मदतीने तसेच तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, निवृत नायब तहसीलदार श्री. रुपनर यांच्या उपस्थितीत पथक घटनास्थळी गेले असता, पाण्याचा प्रवाह अतिशय तीव्र असल्याचे समजले. तरीदेखील बचावकार्य सुरु करण्यात आले.

सपोनि गोरकनाथ दहिफळे, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांचे अंगरक्षक झउ १५९८ उत्तरेश्वर केदार, पांडुरंग फपाळ (कवडगाव घोडा) व अन्य ग्रामस्थांच्या मदतीने रस्सी, दगड व इतर साधनांचा वापर करून अडकलेल्या व्यक्तींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला गेला.

सदरची कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे, झउ १५९८ उत्तरेश्वर केदार, -डख/१५५२ धनराज सोडगीर व गावातील सजग नागरिक यांनी केली आहे

या बचाव कार्यामध्ये सर्वांच्या मोलाच्या सहकार्यामुळे तीन युवकांचे प्राण वाचविण्यात पोलीस प्रशासन व ग्रामस्थांना यश आले आहे. चौथ्या तरुणाचा मृतदेह मिळून आला असून पुढील कायदेशीर कारवाई पोलीस करत आहेत.

पाण्याचा प्रवाह असताना सुद्धा भर पावसात मध्यरात्री भर अंधारात शेत मार्गाने जाऊन पोलिसांनी तिघांना वाचवले...

अखेरीस तीन ते चार जवानांनी रस्सी पकडून प्रवाह ओलांडला व अडकलेला युवक अमर पोळ (रा. डिग्रस) यास सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात यश आले.त्यानंतर इतर दोन युवकांचे आवाज नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावरून २००-३०० मीटर अंतरावरून ऐकू आले. सदर युवकांना थेट रस्सी टाकून पोहोचणे अशक्य असल्याने ऋषीकेश शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार शेतमार्गे फेरफटका मारून गावकऱ्यांच्या मदतीने त्यांचेही प्राण वाचविण्यात आले.

अमर राहुल आणि नवले वाचले दुर्दैवाने बल्लाळचा मृत्यू झाला !

दरम्यान या घटनेत वाहून गेलेल्या अमर मधुकर पौळ (वय २२) रा. डिग्रस, राहुल संपती पौळ (वय ३२), राहुल सटवाजी नवले (वय २२) रा. फुलारवाडी ता. पाथ्री या तिघांना सुखरूप बाहेर काढण्यात यंत्रणांना यश आले असून विशाल बल्लाळ (वय २४) रा. बोरी सावरगाव ता. केज हा तरुण मयत झाला असून त्याचा मृतदेह सिरसाळा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

अजय मुंडे यांची ही तत्परता...

पहाटे युवक नेते अजय मुंडे हे घटनास्थळी दाखल झाले होते, त्यांनी ग्रामस्थांशी व प्रशासकीय यंत्रणांशी चर्चा केली. धनंजय मुंडे हेही दूरध्वनीवरून रात्रभर यंत्रणांच्या संपर्कात होते, तसेच त्यांचे सहकारी राजाभाऊ पौळ, सुभाष नाटकर, तसेच धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयाची टीम घटनास्थळी मदत कार्यात उपस्थिती होती.

**संतोष देशमुखांच्या ..**

विष्णू चाटे हाच वाल्मीकचा राईट हँड

यावेळी आरोपी विष्णू चाटे याच्याही वकिलांनी आपली बाजू मांडली. आपल्या अशिलावर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचा दावा त्यांनी केला. पण उज्ज्वल निकम यांनी त्यांच्या या दाव्यावरही जोरदार हरकत नोंदवली. विष्णू चाटे हा वाल्मीक कराडचा राईट हँड आहे. त्याने वाल्मीकला पूर्ण मदत केली. त्यामुळे मकोका कायद्याच्या तरतुदी या गुन्ह्याला लागू होतात आरोपीला नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विष्णू चाटेची गुन्हेगारी पार्श्वभूमीच कोर्टापुढे मांडत आरोपीचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली. यामुळे विष्णू चाटेच्या वकिलांची चांगलीच पंचाईत झाली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निर्णय ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. त्या दिवशी आरोपींना जामीन मिळतो की त्यांना तुरुंगातच रहावे लागेल हे स्पष्ट होणार आहे. दरम्यान, वाल्मीक कराडच्या वकिलांनी या प्रकरणी हायकोर्टाचे दार ठोठावण्याचे संकेत दिलेत.

**तुलसी कॉलेजने आयोजित ...**

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी चला हवा येऊ द्या फेम अंकुर वाढवे होते, तर अध्यक्षस्थानी प्रा.प्रदीप रोडे आणि विशेष अतिथी सौ.दीपा रोडे उपस्थित होत्या. राज्यभरातील १६७ विद्यार्थ्यांनी

## पान १ वरून...

स्पर्धेत सहभाग नोंदवला. परीक्षक म्हणून कोयल भलगट (अहमदाबाद), पूर्वा बाराई (नागपूर) आणि प्रवीण पव्हारे (छत्रपती संभाजीनगर) यांनी काम पाहिले.तीन वयोगटामध्ये पार पडलेल्या स्पर्धेत लहान मॉडेल्सनी वेगवेगळ्या शैलीत, रंगीबेरंगी पोशाखात रॅम्पवॉक केले. कार्यक्रमात विविध डिझायनर्सचे डिझाईन्स, नृत्य आणि संगीताचे आकर्षक सादरीकरण पाहायला मिळाले, ज्यामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

बेस्ट चॅम्प ऑन रॅम्प ३ ते ६ वयोगटात तृष्णा लोढा प्रथम, जान्हवी जोगदंड द्वितीय व उन्नती वडमारे तृतीय ठरले. ७ ते ११ वयोगटातील फॅशन मॉडेल्सनी आपली छाप सोडली, तर १२ ते १५ वयोगटातील बालकांनी आकर्षक रॅम्पवॉकद्वारे प्रेक्षकांची दाद मिळवली. बेस्ट डिझायनर मध्ये राधा मुगळे प्रथम, वैष्णवी होके द्वितीय आणि साक्षी जेथे तृतीय ठरल्या. सर्व गटांमधील विजेत्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व प्रोफेशनल फोटोशूट व विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचलन निशा कुचेकर यांनी केले, तर आयोजनाची जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य व कर्मचारीवर्गाने यशस्वीपणे पार पाडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यू पंकज ज्वेलर्स, कॅनरा बँक, एसबीएच सरस्वती, श्री लक्ष्मीनारायण जनरल स्टोअर्स, ईडॅक आणि अलंकार ड्रेस्सेस यांसारख्या प्रायोजकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला बीडसह परिसरातील रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**वाण धरण...**

ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी येथील प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी अनेक भाविक दर्शनासाठी येतात आणि परळीत असलेल्या नातेवाईक यांच्याकडे मुक्कामी असतात तसेच सणासुदीचा काळ असल्याने अनेक धार्मिक कार्यक्रम शहरातील नागरिक घराघरात साजरा करतात. यासर्व कामानिमित्त मोठ्या प्रमाणावर पाण्याच्या वापर होत असल्याने परळीकरांना पाणी कमी पडत असल्याने नगर पालिका प्रशासनाने ही पाण्याची कमतरता दूर करावी लागत आहे.

परळी शहराला पाणी पुरवठा करणारे नागापूर येथील वाण धरण कोणत्याही क्षणी ओसंडून वाहणार आहे. परळी शहराला विद्यमान काळात पाच दिवसाला पाणी येत आहे. गौरी गणेशोत्सव सारखे महत्वाचे सण उत्सवाचे दिवस चालू झाले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर नगर परिषदेने लक्ष देऊन पाणी वाहून जाण्यापूर्वी परळीकरांची अडचण दूर करावी.

अश्विन मोगरकर
सामाजिक कार्यकर्ते परळी वै

## भगवान नगर ते घुंगर्डे हादगाव चिखल तुडवत विद्यार्थ्यांना गाठावी लागते शाळा

शहागड/ प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथुन जवळच असलेल्या भगवान नगर येथील वस्तीवरील विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी पावसाळ्यातील चार महिने तारेवरची कसरत करावी लागत आहे पाऊस जर पडला तर या रस्त्यावरून विद्यार्थ्यांना चालणेही अवघड होऊन बसत आहे. या रस्त्याची अत्यंत दुर्दशा झाली असून हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावे अशी मागणी भगवान नगर येथील पालकांनी केली आहे. या रस्त्यावरून दररोज २० ते २५ विद्यार्थ्यांना घुंगर्डे हादगाव येथील जिल्हा परिषद शाळेत येण्यासाठी रस्ता आहे. परंतु पावसाळ्यात विद्यार्थ्यांना गुडघाभर चिखलातून प्रवास करावा लागत आहे. चार



वाजता शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घरी जाण्याची चिंता पडते पाऊस पडला तर कोल्ही नाल्यातून विद्यार्थ्यांना प्रवास करावा लागत आहे संबंधित रस्त्याची ताबडतोब दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी भगवान नगर येथील पालकासह विद्यार्थ्यांनी केली आहे.



# आई - वडिलांच्या सेवेतून सुखाची प्राप्ती - ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

आष्टी (प्रतिनिधी)

आई - वडील यांची सेवा केली तर संसारात सुख कमी पडणार नाही. कोणतीही वारी किंवा देव - देव करण्यापेक्षा आई - वडिलांची घरीच सेवा करा त्यामध्येच तुम्हाला पांडुरंगाची भेट होऊन तुमचे जीवन सार्थकी लागल्याशिवाय राहणार नाही असे सांगत आई - वडिलांच्या सेवेतून सुखाची प्राप्ती होते असे प्रतिपादन संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल यांनी केले.

कडा येथील महेश मंदिर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याच्या काल्याच्या किर्तनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आ. सुरेश धस, माजी आ. साहेबराव दरेकर, सरपंच भीमराव पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी सरपंच श्रीरंग आप्पा कर्डिले, भाजपचे कडा मंडळ अध्यक्ष अनिलतात्या ढोबळे, सेवानिवृत कृषी अधिकारी सुरेश पंडित (पुणे), प्रा. शाम सांगळे, बाळासाहेब कर्डिले, माजी सरपंच रामशेठ मधुरकर, विकास म्हेत्रे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार रघुनाथ कर्डीले, संपतदादा कर्डीले, लिंबराज कर्डीले, पांडुरंग कर्डीले महाराज, सुभाष सोनवणे, पांडुरंग भालके महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना ह. भ. प. बबन महाराज म्हणाले की, गेल्या काही वर्षांपूर्वी संपर्काचे साधन म्हणून मोबाईलचा शोध लागला गेला. आधुनिक तंत्रज्ञानाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली. त्याचे फायदे होत गेले परंतु आता मोबाईलच्या अतिवापरामुळे अनेक दुष्परिणाम होऊ लागले आहेत. त्यामुळे तरुण पिढी बरबाद होत चालली आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांना जाऊन ७५० वर्षे झाली आहेत. त्यांनी ऐन तारुण्यात वयाच्या १६ व्या. वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. मात्र आजचा तरुण ती ज्ञानेश्वरी वाचत नसून मोबाईलमध्ये गुंतला आहे. मोबाईलच्या अतिवापराने त्याला ज्ञान तर मिळणारच नाही उलट तरुणाईची बरबादी होत चालली आहे.

जगण्याचे साधन ज्ञानेश्वरी!

जगण्याचं साधन म्हणून ज्ञानेश्वरी कडे जर पाहिलं तर जीवन सार्थकी लागेल. आचरण शुद्ध ठेवा देव तुम्हाला नक्की भेटेल. ज्ञानेश्वरी वाचल्याने जीवनातील अंधार दूर होईल तर मोबाईल पाहिल्याने बरबाद होताल.

# वैभवी देशमुख च्या शुभहस्ते चिंचाळा,राघापूर गावचा ध्वजारोहण

## सरपंच पंडित पोकळेंनी लाखो मराठ्यांचं मन जिंकलं!



सरपंच संतोष देशमुख यांचं कार्य प्रेरणादायी म्हणून वैभवी देशमुखच्या हस्ते ध्वजारोहण - सरपंच पंडित पोकळे

आष्टी (प्रतिनिधी)

स्वातंत्र्य दिनानिमित्त आष्टी तालुक्यातील चिंचाळा - राघापूर गावच्या ध्वजारोहणाचे निमंत्रण स्व. संतोषअण्णा देशमुख यांच्या मुलीला देण्यात आले होते. ही चिंचाळा ग्रामस्थांसाठी अभिमानाची गोष्ट होती. वैभवी संतोष देशमुख हिनं ध्वजारोहणासाठी उपस्थित राहून चिंचाळा गावच्या अभिमानात भर टाकली आहे. खरंच संघर्ष आणि त्यातून मिळालेले यश हे खूप मोठं असतं तेच यश जेव्हा आपल्या गावी येते तेव्हा आनंद गगनात मावत नाही असंच काहीसं चित्र चिंचाळा गावांमध्ये पाहायला मिळालं. वैभवी देशमुख ला ध्वजारोहणाचा मान देऊन सरपंच पंडित पोकळे यांनी केलेलं काम हे गावासाठी अभिमानाचे आहेच पण महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांसाठी देखील अभिमानाचे ठरले आहे.

सरपंच पंडित पोकळे यांनी घेतलेल्या निर्णयाचं सर्वस्तरातून कौतुक केलं जात आहे. आष्टी तालुक्यातील चिंचाळा, राघापूर गावच्या ध्वजारोहणासाठी १३ तारखेला गावातील ज्येष्ठ नागरिक भाऊसाहेब सत्यबापू पोकळे व सिद्धार्थ बाबा पोकळे यांच्या हस्ते तसेच १४ तारखेला ग्रामसेवक निशा जगताप व ग्रामपंचायतचे इतर सहकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले तर १५ ऑगस्ट रोजी स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या मुलीला निमंत्रित करण्यात आले होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण वैभवी देशमुख यांच्या हस्ते करून गावातील गुणवंतांचा देखील गुणगौरव कार्यक्रम वैभवी देशमुख व धनंजय भैय्या देशमुख यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. विशेष म्हणजे वैभवी देशमुखने नीट परीक्षेमध्ये मिळवलेल्या यशाबद्दलही तिचाही ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर राजू सुखदेव पोकळे फौजी, राजू वसंत पोकळे फौजी, वैभव बबन पोकळे तसेच डॉ. शुभांगी सोमीनाथ पोकळे तसेच पडद्यामागचे हिरो म्हणून ग्रामपंचायत चे कर्मचारी कायम उत्कृष्ट काम करणारे लक्ष्मण पोकळे, अविनाश पोकळे व संतोष पोकळे यांचा ही सत्कार मान्यवरांच्या हस्ते झाला.

यावेळी गावचे सरपंच पंडित पोकळे, पोलीस पाटील गणपत पोकळे, उपसरपंच ज्ञानेश्वर पोकळे, ग्रा. पं. सदस्य बाळासाहेब पोकळे, ग्रा. पं. सदस्य अनिल पोकळे, ग्रा. पं. सदस्य भाऊसाहेब तांबे, ग्रा. पं सदस्य बेबीताई पोकळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भाऊसाहेब पोकळे, सेवा सह. सो. चे व्हा. चेअरमन कृष्णा तांबे, माजी सरपंच दिगंबर पोकळे, राधाकिसन पोकळे, जालिंदर पोकळे, डॉ. अशोक पोकळे, डॉ. सोमनाथ पोकळे, सुखदेव तात्या, राजू पोकळे, अशोक पोकळे, डॉ. साळुंके, गणेश पोकळे, सागर पोकळे, शिक्षक - शिक्षिका, कर्मचारी, ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व मान्यवरांचे चिंचाळा, राघापूर गावासह परिसरातील नागरिकांचे सरपंच पंडित पोकळे यांनी आभार व्यक्त केले. देशमुख कुटुंबीयांच्या चालल्या न्याय हक्काच्या लढ्याला चिंचाळा गावचे शेवटपर्यंत सहकार्य व साथ असेल असाही शब्द सरपंच पंडित पोकळे यांनी यावेळी दिला.

सरपंच संतोष देशमुख यांचं कार्य प्रेरणादायी म्हणून वैभवी देशमुख ध्वजारोहणासाठी

स्व. सरपंच संतोष देशमुख फक्त सरपंच नव्हते ते महाराष्ट्रातील सरपंचाला प्रेरणादायी उदाहरण होते. त्यांनी केलेलं कार्य खूप मोठं होतं. ते आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांची झालेली निर्घुण हत्या ही निंदनीय आहेच आणि मानव जातीला काळिंबा फासणारी आहे. त्यांच्या पश्चात न्याय हक्कासाठी त्यांच्या मुलीने म्हणजे वैभवी ने केलेला संघर्ष हा खूप मोठा आहे त्यातून मिळालेले यश हे उल्लेखनीय आहे म्हणूनच वैभवी देशमुख हीच्या हस्ते हे ध्वजारोहण करण्यात आले. त्यांच्या हस्ते गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. ही आमच्या गावासाठी अभिमानाची बाब आहे. या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित असलेल्या धनंजय भैय्या देशमुख आणि वैभवी संतोष देशमुख, सागर आप्पा धस यांचे आभार मानतो. सरपंच पंडित पोकळे (सरपंच - चिंचाळा, राघापूर ग्रुप ग्रामपंचायत)फ

# कंकर सिंह टाक राष्ट्रीय आदर्श पुरस्कारा ने सम्मानित

पाटोदा (प्रतिनिधी)

बीड येथील प्रसिद्ध कराटे प्रशिक्षक खालसा स्पोर्ट अकेडमी चे संचालक कंकर सिंह टाक व सहकारी शिक्षक राख भागवत याना रविवार दि.. १७/०८/२५ रोजी नाशिक (पंचवटी) येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहल्यत दुधारे क्रीड़ा फाउंडेशन चा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार देउन सम्मानित करन्यात आले.सदरिल पुरस्कार हा खालसा स्पोर्ट अकेडमी तरफे गेल्यां १५ वर्षा पासुन क्रीड़ा क्षत्रत अनेक मूला मूली ना कराते खेल च्य मध्यमतुन स्व रक्षण. समाज रक्षण, पारिवारिक मर्यादा, देश सेवा बद्दल जागृत करन्यात येत आहे. व कराटे खेला च्या मध्यमतुन अनेक मूला मूली ना तालुका, ज़िला, विभाग, राज्य, व राष्ट्रीय परियंत यशस्वी कामगिरि केलेली



आहे. व अनेक मिडल पटकावलेले आहेत. महिलना व मुलिना आत्म रक्षा (सेल्फ डिफेंस)चे प्रशिक्षण देने ,शिक्षना पासुन वंचित विद्यार्थी ला सहकारीय करने शालेय साहित्य वाटप करने, सामाजिक सेवा करने, च्य करीता सम्मानित करन्यात आले.सदरील पुरस्कार वितरण नाशिक (पंचवटी) कालिका मंदिर सभागृह येथे संपन्न झाला शाल, पुष्पहार, सम्मान चिन्ह, मानपत्र, असे पुरस्कारचे स्वरूप होते. कार्यकरमा चे अध्यक्ष , अन्ना साहब पाटिल, व लखुजी राव जाधव यांचे तेरा वे वंशज शिवाजी राजे जाधव यांचे सुभ हस्ते प्रदान करन्यास आले.या प्रसंगी दुधारे फाउंडेशन चे अध्यक्ष, अशोक दुधारे व उप अध्यक्ष, आनंद खरे, तर इतर सदस्य उपस्थित होते.कंकर सिंह टाक याना पुरस्कार मिलाले बद्दल सर्वस्तरातुन अभिनंदन

# वडवणी शहरातील पांढरी वस्तीतील सिमेंट रस्त्याचे काम सुरू करा - गणेश टकले

## नगरसेवक यांच्या दुर्लक्ष मुळे रस्तेचा विकास होईना

वडवणी (प्रतिनिधी)

आज दिनांक १८/०८/२०२५ सोमवार रोजी ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका च्या वतीने नगरपंचायत कार्यालयाचे प्रशासकीय अधिकारी सौ.एम.करांडे मॅडम यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली की वडवणी शहरातील पांढरी वस्ती प्रभाग क्र.११व प्रभाग क्र.१२ मधील राममंदिर चौक ते नवीन जिल्हा परिषद शाळा पर्यंतचा हा रस्ता पूर्ण खडेयमये झाला असल्यामुळे . सदरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे पाणी,चिखल झाल्यामुळे नागरिकांना




रस्त्यावर चालण्यासाठी खूप अडचणीस सामोरे जावे लागत आहे यामुळे नागरिकांना मोठा संघर्ष करावा लागत आहे.वॉर्ड क्र.१२ पांढरी वस्ती वरील शेवटचा भाग असलेला रस्ता अंकुश म्हेत्रे ते मुरली बारड, महादेव लोकरे यांच्या घरापर्यंत जाणारा रस्ता सध्या पावसामुळे पूर्ण खड्डेमय व चिखल झाल्यामुळे नागरिकांना राहदारीस नाहक त्रास होत आहे . तसेच या वार्डातील विधुतपोल वरील लाईट गेलेले बल्ब नवीन बसविण्यात यावेत.तरी या अगोदर सुद्धा दोनवेळा निवेदन देऊन सुद्धा अजून दखल घेण्यात आलेली नाही तरी मी आपल्याला माहिती करिता परत आपल्याला निवेदन देऊन मागणी करत आहे अन्यथा आपल्या नगरपंचायत समोर धरणे आंदोलन करण्यात येईल असे निवेदन वडवणी नगरपंचायत च्या प्रशासकीय अधिकारी सौ. करांडे मॅडम यांना लेखी निवेदन दिले असता यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा सहसघटक गणेश दादा टकले,शंकर झाडे सर , सिदेश्वर ढवळशंक, संतोष म्हेत्रे,दत्तात्रय भंडारे,लक्षमण भुजबळ,शिवाजी व्हावळ, दत्तात्रेय भागवत, शिवाजी चिनके,जगन्नाथ लोकरे, उपस्थित होते.

# मांडवा शाळेचे मुख्याध्यापक श्री.जगन्नाथ सोनवणे व सहशिक्षक श्री.शशिकांत भोकरे यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा

आष्टी (प्रतिनिधी)

नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे मांडवा शाळेचे आदर्श मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ सोनवणे व आदर्श सहशिक्षक श्री. शशिकांत भोकरे हे दोघेही ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त श्री. जगन्नाथ राघोबा सोनवणे (राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक जि. प. प्रा. शा. मांडवा) व श्री. शशिकांत आदिनाथ भोकरे (सहशिक्षक जि. प. प्रा. शा. मांडवा) यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, गणपती चौक, आष्टी, जि. बीड येथे आयोजित केला आहे.

तरी या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून आ. सुरेश आण्णा धस (आमदार आष्टी, पाटोदा, शिरूर) हे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब, मा. आ. साहेबराव दरेकर नाना, मा. आ. बाळासाहेब आजबे काका, विजयकुमार गोल्हार (भाजपा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य), सौ. सविताताई गोल्हार (माजी जि. प. अध्यक्षा, बीड), देविदास आबा धस (माजी जि. प. सदस्य, बीड), किशोर नाना हंबर्डे (अध्यक्ष, आष्टी शिक्षण प्रसारक मंडळ), रावसाहेब आबा लोखंडे (मा. पं. स. सदस्य, आष्टी) यांची उपस्थित लाभणार आहे.



याप्रसंगी प्रमुख उपस्थिती गोकुळ बागलाने साहेब (प्रशासक तथा गटविकास अधिकारी पं. स. आष्टी), मनोरंजन धस साहेब (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, बीड), श्रीम. सिमा काळे मॅडम (गटशिक्षण अधिकारी, आष्टी), धनंजय बोदांर्डे साहेब (गट शिक्षण अधिकारी, पाटोदा), प्रशांत शिंदे (गटशिक्षणाधिकारी, शिरूर का.), मोहन काकडे साहेब (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, आष्टी), विक्रम पोकळे साहेब (मा. शिक्षणाधिकारी, बीड), अर्जुन गुंड साहेब (मा. शिक्षण विस्तार अधिकारी आष्टी), सुरेश पवार साहेब (मा. शिक्षण विस्तार अधिकारी, आष्टी), मोहन जगताप (मा. सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा), मारूती पठाडे (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा), अशोक लटपटे (उपाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा), महेशकुमार शिंदे (सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा) व सर्व संचालक मंडळ स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था, कडा यांची असणार आहे.

तरी तालुक्यातील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रघुनाथ खंडागळे (केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक बेलगांव) व सर्व घटक शाळा मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद केंद्र, बेलगांव, ता. आष्टी, जि. बीड तसेच सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य व समस्त ग्रामस्थ मांडवा, ता. आष्टी, जि. बीड यांनी केले आहे.

# गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आरोपी गुन्हे शाखेने केला जेरबंद

परळी / प्रतिनिधी

परळी-सोनपेठ परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या व्यमतीविरोधात महाराष्ट्र धोकादायक क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा अंतर्गत कारवाई करून ही या कारवाईला न जुमानता सर्व सामन्यात निर्भीडपणे वावरून आपले कृत्य करणाऱ्या आरोपीला बीड गुन्हे शाखेने सोमवार दि १८ रोजी जेरबंद केले.

शुभम दशरथ जाधव (वय ३२ वर्षे राहणार नैकोटा तालुका सोनपेठ जिल्हा परभणी.ह.मु विद्यानगर परळी) या इसमा विरुध्द पोलीस ठाणे परळी शहर व सोनपेठ येथे खुनाचा प्रयत्न करणे, अपहरण करणे, गंभीर दुखापत करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जिवे मारण्याच्या



धमक्या देणे, शिवीगाळ करणे वगैरे गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०२ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहे.तसेच आरोपी व्यक्तीने आपली वर्तनुक सुधारावी म्हणुन यापुर्वी एक वेळा प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालुच ठेवुन होता. त्याची परळी शहर व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत असल्याने त्याविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली होती.

सदरील आरोपी हा परळी येथील चेंबरी रेस्ट हाऊस जवळ उभा आल्याच्या माहितीवरून बीड स्थानिक गुन्हे शाखेचे रामचंद्र केकान,गोविंद भताने व सचिन आंधळे यांनी सापळा रचून ताब्यात घेत संभाजी नगर पोलिसांच्या ताब्यात दिले.

# अप्पर कुंडलिका धरणातुन मामला, तीगांव, चिंचोटी तलावात पाणी सोडा

## लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांची मागणी

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील सर्वात मोठी नदी असलेल्या अप्पर कुंडलिका नदीवरील सोन्नाखोटा येथे उभारण्यात आलेला अप्पर कुंडलिका प्रकल्प तसेच उपळी येथे उभारण्यात आलेला कुंडलिका प्रकल्प मागील अनेक दिवसांपासून तुडुंब भरला असून वरच्या बाजूला झालेल्या पावसाचे पाणी नदीपात्रातून खाली वाहून जात आहे. हे पाणी मामला, चिंचोटी आणि तीगांव या लघु प्रकल्पांना सोडले तर ते लघु प्रकल्प तुडुंब भरतील कारण लघु प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा आहे. या लघु प्रकल्पांना पाणी सोडण्यासाठी पाटबंधारे विभागाने तत्काळ पावले उचलावीत आणि दुष्काळी भागाला मदत करावी अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी केले आहे.

बीड जिल्ह्याच्या इतर भागांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे अनेक जलप्रकल्प पाण्याने तुडुंब भरलेले आहेत. वडवणी तालुक्यात सर्वात मोठी नदी असलेली कुंडलिका नदी ही बीड तालुक्यातून वाहत येते. वरच्या बाजूला मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे वडवणी तालुक्यातील अप्पर कुंडलिका प्रकल्प आणि उपळी येथील कुंडलिका प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत.



### अनेक गावांना होणार फायदा

मामला, चिंचोटी, तीगाव या तीन तलावात पाणी सोडल्याने मामला तिगाव चिंचोटी हरिश्चंद्र पिंपरी बाहेगवान चिंचाळा केंडे पिंपरी धानोरा साळींबा आदी गावांना फायदा होणार आहे. कारण हे तलाव भरल्यानंतर सांडव्याद्वारे वाहणाऱ्या वाहणारे पाणी खालील भागामध्ये जमिनीत पाणी मुरले जाते त्याचा परिणाम या भागातील शिवारांना फायदा होतो.

वडवणी तालुक्यात मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला नसल्यामुळे या तालुक्यातील पाण्यावर अवलंबून असलेले साधे लघु प्रकल्प देखील भरलेले नाहीत. या तालुक्यातील मामला, चिंचोटी, साळिंबा आणि तीगाव हे लघू प्रकल्प अद्यापही २० ते २५ टक्के भरलेले आहेत. त्यामुळे इथं जलसाठा होणे आवश्यक आहे. पावसाळा केवळ एक महिना राहिला आहे. आणि पुढच्या काळात पाऊस पडेल असे चिन्ह दिसत नाहीत. सध्याही वडवणी तालुक्यात अत्यंत कमी पाऊस पडलेला आहे. त्यामुळे तीगाव, चिंचोटी आणि मामला या भागातील दुष्काळी परिस्थिती टाळण्यासाठी या तलावात सोन्नाखोटा येथील अप्पर कुंडलिका प्रकल्पाचे पाणी बंदिस्त पाईपलाईन द्वारे सोडण्यात यावे अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा तीगावचे सरपंच राज पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे.

माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके हे विकासाच्या दृष्टीने वेळोवेळी प्रयत्नशील असतात. माजलगाव मतदार संघातील अनेक प्रश्न ते सहजपणे सोडवतात हा प्रश्न देखील आमदार प्रकाश दादा सोळंके प्रशासनाकडून सोडवून घेतील याची खात्री एडवोकेट राज पाटील यांना आहे. त्यामुळे त्यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांची सोमवारी सकाळी भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. आमदार दादांनी तत्काळ प्रशासनाला या संदर्भात पावले उचलण्यासंदर्भात सुचना केली आहे.

### अन्यथा टँकरने पाणी प्यावे लागते

वडवणी तालुक्यातील मामला, चिंचोटी, तीगाव, चिंचाळा, पिंपरखेड, राजा हरिचंद्र पिंपरी या परिसरात दरवर्षी कमी पाऊस पडतो मात्र हे लघु प्रकल्प जर पाण्याने भरले तर या भागातील पाणी पातळी थोडीफार का होईना टिकून राहते मात्र या वर्षी लघु प्रकल्प केवळ २५ टक्के भरलेले आहेत पावसाळा संपत आलेला आहे आणि जर लघु प्रकल्प भरले नाहीत तर उन्हाळ्यामध्ये या भागातील जलस्त्रोत खूप खोलवर जातो आणि या भागात पिण्याच्या पाण्याची देखील पंचायत होते त्यामुळे टँकरने पाणी पुरविण्याची वेळ या भागातील गावावर येते. हे टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावेत आणि या तलावात पाणी सोडण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांनी केली.

# आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघातील पुणे शहर आणि परिसरात स्थायिक झालेल्या रहिवाशांचा आभार

पाटोदा (प्रतिनिधी)

पिंपरी चिंचवड शहरातील आहेर गार्डन याठिकाणी आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघातील पुणे शहर आणि परिसरात स्थायिक झालेल्या रहिवाशांचा आभार मेळावा आमदार सुरेश आण्णा धस यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा मेळावा जनतेच्या आमदार धस यांच्या वर आसलेले प्रेम आणि जिव्हाळ्याचा आनंद सोहळा होता. धस निवडणुकीत निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी या नात्याने मतदारसंघातील दीन-दलित, शोषित, पिडीत, गोरगरीब बांधवांचे प्रश्न सोडवणे हीच प्राथमिकता ला आ.धस यांनी महत्व दिले

रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्या बांधवांच्या वेदना, शहरात शिक्षण घेताना ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी, वैद्यकीय सुविधा मिळवताना होणारी आर्थिक पिळवणूक आणि रोजगार आदी विषयांवर उपस्थित नागरिकांशी आमदार धस यांनी मनमोकळा संवाद साधला. आपल्या विधानसभा मतदारसंघातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी 'जरेवाडी पॅटर्न' मोठ्या प्रमाणात राबविण्यासाठी आ.धस हे प्रयत्नशील आहे ही बाब नम्रपणे त्यांनी या मेळाव्यात नमूद केली.या



कार्यक्रमात राहुल रमाकांत खिळे (झडख पदी नियुक्ती), सौ.सविता दिनकर धोंडे (शिक्षण विस्तार अधिकारी पदी नियुक्ती), गौरव मोहन बेदरे (चइ- साठी निवड) आदींचा सत्कार आमदार धस यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी मा.सभापती कृ.उ.बा.स.खेड श्री विलासशेठ कातोरे, मा.सरपंच दत्ताभाऊ साखरे, तानाजी बापू जंजिरे, कैलास माने, दत्ता सावंत, शिवाजी कुटे, बाळासाहेब गायकवाड, लाला जांभुळकर यांच्यासह पुणे व आजूबाजूच्या परिसरात स्थायिक झालेले मराठवाड्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आपुलकीरूपी उपस्थितीबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार आमदार धस यांनी मानले

# ओंकारेश्वर ते गौरीशंकर महादेव मंदिर शिवस्वरूप जनार्दन स्वामी पायी कावड यात्रा २० ऑगस्ट रोजी जाफराबादेत दाखल होणार

## जालना जिल्ह्यातील सर्वात मोठी ३११ किलोमीटर एकमेव कावड यात्रा



जाफराबाद/ प्रतिनिधी

शिवस्वरूप जनार्दन स्वामी महाराज,परम पूज्यनीय माधवगिरीजी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व परम पूज्यनीय महेशगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आशीर्वादाने शिवस्वरूप जनार्दन स्वामी महाराज कावड यात्रा मध्यप्रदेश येथील ओंकारेश्वर महादेवाचे दर्शन व नर्मदा मातेचे पवित्र जल घेऊन दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी ओंकारेश्वर येथून निघाली असून ही कावड यात्रा

दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी वार बुधवार ला जाफराबाद शहरातील अहिल्यादेवी होळकर चौक येथे आगमन होणार असून या कावड यात्रेकरूंचे जाफराबाद शहरात सकल हिंदू बांधवांच्या वतीने व संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या भक्त परिवाराकडून भव्य मिरवणूक काढून स्वागत करण्यात येणार आहे.

ही पायी कावड यात्रा एकूण ३११ किलोमीटर असून जालना जिल्ह्यातील सर्वात मोठी कावड यात्रा आहे.

या कावड यात्रेत जाफराबाद तालुक्यातील संत जनार्दन स्वामी भक्त परिवाराचे , श्री नारायण पोटे, श्री.साहेबराव अंभोरे, विशाल दांडगे रमेश वाघमारे, राहुल पवार,दगडूबा शेळके, यांचा सहभाग आहे.तरी या कावड यात्रेकरूंच्या स्वागतासाठी सकल हिंदू बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन जय जनार्दन भक्त परिवार जाफराबाद तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे ..



## चिमुकल्यांनी साकारली राधा-कृष्णाची मोहक वेशभूषा..

जाफराबाद प्रतिनिधी:

जाफराबाद:-राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी येथे कृष्ण जन्माष्टमी निमित्त विशेष उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात शाळेतील विद्यार्थी वेदांत राहुल वरगणे व अनुश्री दुनगहु या बालगोपाळांनी राधा-कृष्णाची आकर्षक वेशभूषा साकारून उपस्थितांचे मन जिंकले.बालगोपाळांच्या या सुंदर सादरीकरणामुळे वातावरणात भक्तीभावाची एक अनोखी लहर पसरली होती. शाळेतील शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सणांचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



## (बदनापूर येथिल देवगिरी प्रतिष्ठाण संचलित गुरूकुलम् शिशुवाटीका येथे ७९ स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख उपस्थिती डॉ. धनंजय शेळके सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी उपस्थित डॉ. धनंजय शेळके , संस्थेचे अध्यक्ष भगवानराव मात्रे , अँड बालाजी वाघ , मदनराव पाटील , विष्णू मात्रे , शिवाजी सुरडकर , शाळेचे व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे , शिक्षिका अश्विनी डिघे , योगिता सिरसाठ , निकिता लहाणे , आलेश कांबळे , इतर नागरिक, पालक वृंद , व देशप्रेमी उपस्थित होते.

# आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते मेंढपाळांच्या मेंढ्यासाठी औषधी व लसीचे मोफत वाटप

### मेंढपाळानी मेंढ्यासाठी मोफत औषध,लसीचा लाभ घ्यावा -प्रकाश जाडकर

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सततचा पाऊस चालू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील मेंढपाळांच्या मेंढ्यांना साथ रोगांचे आजार होत आहेत.केजमतदार संघाच्या आमदार सौ. नमितताई मुंदडा यांनी महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागाला तातडीच्या सूचना देऊन मेंढ्यांना रोग प्रतिबंधक लस उपलब्ध करून मेंढपाळांच्या मेंढ्यांना लसीचा डोस पाजून आमदार सौ.नमितताई मुंदडा यांच्या हस्ते कुंबेफळ येथे झालायापूर्वी मेंढपाळांना खाजगी रुग्णालयातून औषधी आणून हजार रुपये खर्च करावे लागत होते आता मोफत औषध उपचार व लसी देण्यात येत आहेत याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार नमिता मुंदडा यांनी केले.मेंढपाळ बांधवांनी मोफत औषध उपचार व लसी घ्याव्यात असे आवाहन प्रकाश जाडकर यांनी केले. कुंबेफळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी चंदनसावरगाव पशुधन पर्यवेक्षक डॉ.अनिकेत काटुळे,भाजप ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष प्रकाश जाडकर,सुरेश नांदे,गोपाळ मस्के, विष्णू थोरात,रामकृष्ण भंडारे,संदीप थोरात व परिसरातील मेंढपाळ उपस्थित होते.



### केज तालुक्यात आरोग्य विभागाचा अजबच प्रकार

# कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी महिलांना करु लागले बळजबरी

केज/प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य केंद्र विडा परिसरातील गावागावांत आशा स्वयंसेविका घराघरात जाऊन कुटुंबातील महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी सक्ती करु लागल्या आहेत.आशा स्वयंसेविका कुटुंबातील महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये साठी प्रवृत्त करण्या बरोबरच बळजबरी पण करु लागल्या आहेत. महिलांचे फोटो काढणे सह्या घेणे प्रकार सुरू केला आहे.त्यामुळे विडा परिसरात महिला दडपणाखाली आल्या आहेत.आशा स्वयंसेविकांना गावातील महिला सही देत नाहीत म्हटले तर त्या म्हणतात तुमच्या सर्व योजना सरकार बंद करणार आहे.हा अजब च प्रकार पाहून महिला घाबरून गेल्या आहेत. या प्रकरणी काय गोड बंगाल आहे हे आरोग्य विभागाने तातडीने स्पष्ट केले पाहिजे असे या भागातील लोक म्हणत आहेत.आज लहुरी आणि परिसरातील गावागावांतून लोक म्हणत आहेत की हा प्रकार तातडीने थांबला पाहिजे सध्या सगळी कडे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या या प्रकरणी लोक दडपणा खाली आले आहेत. तरी तालुका वैद्यकीय अधिकारी केज आणि विडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी आशा स्वयंसेविकांना हा प्रकार थांबविण्यास तातडीने सुचना द्याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या विषयात जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी लक्ष वेधले पाहिजे असे हि लोक बोलत आहेत.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे करून तात्काळ मदत द्या- नामदेव सोजे

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यामध्ये मागील चार-पाच दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास मिळवला जात आहे त्यामुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे करून तात्काळ मदत द्या अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा प्रमुख नामदेव सोजे पाटील यांनी केली आहे. तालुक्यात सतत चार-पाच दिवस झाले पावसाने धुमाकूळ घातलेला आहे यामध्ये शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेल्या पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या मध्ये कापुस सोयाबीन तुर मूग उडीद कांदा भाजीपाला यासारख्या पिकाचे सतत पडणाऱ्या पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे शेतकरी आधीच सततच्या कर्जाने हवालदिल झालेला आहे शेतकऱ्यांनी या पिकासाठी खाते औषधे व इतर लागणारा खर्च कसाबसा सावकाराकडून कर्ज काढून केलेला आहे आता हे कर्ज शेतकरी कसे फेडणार शेतकऱ्याचे या पाण्याने



मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे सोयाबीन कापूस तूर यासारखे पीक हातातून गेलेली आहेत त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे ही मदत जर मिळाली तर शेतकऱ्यांना थोडाफार धीर येईल त्यामुळे मतदारसंघातील आमदार खासदारांनी प्रशासनाला आदेश देऊन तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयाची मदत जाहीर करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मा. विधानसभा प्रमुख नामदेव सोजे पाटील यांनी केली आहे.

# श्रावण सोमवार निमित्त फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने खोलेश्वर महादेव मंदिरात भाविकांना फराळाचे वाटप

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

हिंदू धर्मात श्रावण महिन्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. श्रावण महिना हा अतिशय पवित्र मानला जातो. या महिन्यात अनेक मंदिरात किंवा अन्य ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. आज श्रावण महिन्यातील शेवटचा सोमवार असल्याने श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पुढाकाराने, अंबाजोगाई येथील प्राचीन श्री खोलेश्वर महादेव



मंदिरात श्रावण महिन्यातील पवित्र श्रावण सोमवारी भक्तिभावाने फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी श्रद्धेच्या माध्यमातून सेवा आणि समाजाशी जोडलेली नाळ विद्यार्थ्यांमध्ये बळकट करणे हाच खरा उद्देश असल्याची भावना व्यक्त केली..सकाळपासूनच मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. दर्शन करून परत जाणाऱ्या भाविकांना साबुदाणा खिचडी आणि फळे यांचा समावेश असलेल्या उपवास फराळाचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात बी. फार्मसी महाविद्यालयाच्या छडड विभागातील स्वयंसेवकांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि सेवाभावी योगदान दिले. त्यांनी गर्दी नियंत्रण, फराळ वितरण, स्वच्छता व्यवस्थापन आणि विशेष गरजा असलेल्या भाविकांना मदत अशा विविध सेवा दिल्या. या प्रसंगी छडड कार्यक्रम अधिकारी प्रा. मंदार चौधरी, तसेच प्राध्यापक डॉ. गितांजली चव्हाण, काव्या रेड्डी, अश्विनी घोळकर, मंजुषा करेप्पा, अमर कावरे, विशाल साखरे, इम्रान सय्यद, मामूण कुरेशी, गणेश गिरी, ज्योती मुरकुटे, रोहित हलगुंडे, आशिष ढेले व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

# अंबाजोगाईत पदोपदी-क्षणोक्षणी स्नेहसंवर्धनाचा अनुभव - प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य

### प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य यांना आंतरभारतीचा स्नेहवर्धन पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आंतरभारतीच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने दर वर्षी प्रमाणे १५ ऑगस्ट रोजी १२ वा स्नेहवर्धन पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. या वर्षी अंबाजोगाई परिसरात अनेक इंजिनियर घडवणारे स्थापत्य शास्त्राचे प्रमुख प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य यांना हा पुरस्कार देण्यात आला. अध्यक्षस्थानी आंतरभारती, आंबाजोगाईच्या अध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बरुरे होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आंतरभारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्राचार्य पांडुरंग नाडकर्णी (गोवा), अमर हबीब (विशेष अतिथी तथा मार्गदर्शक आंतरभारती), सिंधुताई पनिकर




(गतवर्षीच्या सत्कारमूर्ती) व कार्यक्रमाचे संयोजक ऍड. प्रवीण बजाज मंचावर उपस्थित होते. हा पुरस्कार गतवर्षीच्या सत्कारमूर्ती सिंधुताई पनिकर यांच्या हस्ते व मंचावरील उपस्थितीत देण्यात आला.

स्नेहवर्धन पुरस्कार*

सानेगुरुजी यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी आंतरभारतीची स्थापना केली होती. तेच उद्देश्य पुढे नेणारा हा पुरस्कार आहे. हा पुरस्कार अन्य राज्यातून आलेल्या, अंबाजोगाईत स्थायिक झालेल्या व आंबाजोगाईच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्तीला दिला जातो.

प्रेमळ माणसांचे गाव*

डॉ विवेकानंद राजमान्य सुमारे ३० वर्षांपूर्वी आंबाजोगाईत आले व आंबाजोगाईचे झाले. ते म्हणाले की, अंबाजोगाईची माणसे खूपच प्रेमळ आहेत. मला येथे काम करताना कधीच परकेपण वाटले नाही. गावातील लोकांनी मी अन्य राज्यातील परका माणूस आहे अशी जाणीव होऊ दिली नाही.

प्रमुख पाहुणे प्रा. नाडकर्णी सर, मार्गदर्शक अमर हबीब व प्राचार्य बी आय खडकभावी सर यांनी आपल्या मनोगतातून सानेगुरुजीचे विचार, आंतरभारतीचा उद्देश व कार्यप्रणाली याविषयी प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. शैलजा बरुरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचन ऍड. प्रवीण बजाज यांनी केले. आंतरभारतीचे सभासद, गावचा सामाजिक वारसा पुढे नेणारे नागरिक तथा प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य सरांचे सहकारी, कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## धुनकेश्वर हे डोंगरपट्ट्यातील तेरा शिवलिंगांपैकी एक प्राचीन दैवत:- केशव महाराज पवार

वडवणी/प्रतिनिधी

देवामध्ये कधीही भेदभाव करू नये. शिव-हरी वेगळे नसून ते एकच आहेत.म्हणूनच भेदभाव न करता भक्तिभावाने पूजा केली पाहिजे.ईश्वराला नावं अनेक असली तरी तो सर्वत्र एकच आहे.माणसा-माणसांत, पंथा- पंथात किंवा देव-देवतांमध्ये भेदभाव निर्माण करणे चुकीचे आहे. समाजामध्ये ऐक्य आणि सौहार्द वाढावे, भक्ति-भावातूनच खरा परमार्थ साधाता येतो.असे धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव धुनकवाड येथे चौथा श्रावण सोमवार आयोजित कीर्तन सोहळ्यात बोलताना शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार यांनी भाविक-भक्तांना एकात्मतेचा संदेश दिला.

यावेळी केशव महाराज पवार यांना चौथ्या श्रावण सोमवारच्या महाप्रसादाचे यजमान यांच्या वतीने ग्रामदैवत धुनकेश्वराची प्रतिमा,फेटा,पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.गेल्या दहा वर्षांपासून धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव आयोजित केला जात आहे.यावर्षीही श्रावण महिन्यातील चार



सोमवारी नामांकित किर्तनकारांचे किर्तन झाले यामध्ये पहिला श्रावण सोमवार ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके,दुसरा श्रावण सोमवार ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे,तिसरा श्रावण सोमवार ह.भ.प. वैराग्यमुर्ती रामकृष्ण बापु रंधवे तर चौथा सोमवार ह.भ.प.केशव महाराज पवार यांच्या सुश्राव्य वाणीतून किर्तन सेवा झाली व महाप्रसाद झाला.

पुढे बोलताना केशव महाराज म्हणाले की,

डोंगरपट्टच्यातील तेरा प्राचीन शिवलिंगांपैकी धुनकेश्वर हे एक महत्त्वाचे स्थान असून या पवित्र स्थळी धुनकेश्वर क्षेत्राचे धार्मिक महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, डोंगरपट्ट्यात तेरा प्राचीन शिवलिंगांची परंपरा आहे. यापैकी धुनकेश्वर हे एक प्राचीन आणि ऐतिहासिक शिवलिंग असून

तेरा शिवलिंगांमध्ये धुनकेश्वरला विशेष मान आहे.येथे श्रावण महिन्यात भाविकांची विशेष गर्दी असते.जो अमृत पचवतो तो देव परंतु जो वीष पोचवतो तो महादेव,निळकंठेश्वर हे होय.जिवनात परमार्थ करत असताना निष्ठेने व प्रमाणीक करा असेही शेवटी सांगितले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आधार मल्टीस्टेटने सामाजिक बांधिलकी जोपासली - पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने

## आधार मल्टीस्टेटच्या जीवनगौरव पुरस्काराने महागायक सुभाष शेप सन्मानित

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

संपूर्ण मराठवाड्यात आर्थिक क्षेत्रात ज्यांचा दबदबा आहे आणि व्यवहारात ज्यांच्याकडे पारदर्शकता व प्रामाणिकपणा आहे. अशा आधार मल्टीस्टेटने सातत्याने समाजातील वेगवेगळ्या प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्वांना त्यांच्या क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल सन्मानित केले आहे. खऱ्या अर्थाने समाजाचा चांगुलपणा जपणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. त्यामध्ये 'आधार'चा समावेश आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक तथा ज्यांना संगीताची कसली ही परंपरा नाही अशा महागायक सुभाष शेप यांना त्यांच्या २५ वर्षांच्या सांगितिक सेवेतील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार आणि कृतज्ञता सोहळा शनिवार, दि.१६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांनी आधार मल्टिस्टेट ही सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था असल्याचे सांगितले. आधार मल्टीस्टेट ही संस्था मुठभर लोकांना मोठी करणारी नव्हे तर श्रमजीवी, कष्टकरी, प्रामाणिक आणि ज्यांना दिवसा उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पडते आणि तो त्यासाठी संघर्ष करतो अशा गरजू व रस्त्यावर व्यवसाय करून स्वतःचा आणि आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करणाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करते आहे. आधार मल्टीस्टेट ही केवळ व्यवसाय नाही. तर सामाजिक भान राखून काम करणारी संस्था आहे. दरवर्षी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अर्थ, उद्योग, सहकार, कला, साहित्य, क्रीडा क्षेत्रात ज्यांचे चांगले काम आहे अशांचा सन्मान करून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचे काम करते आहे. असाच अनोखा कार्यक्रम शनिवार, दि.१६ ऑगस्ट रोजी आधार मल्टीस्टेटच्या 'अजिंठा हॉल' या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. सुप्रसिद्ध महागायक सुभाष शेप यांनी सांगितिक क्षेत्रात २५ वर्षे सातत्याने अखंडितपणे सेवा देण्याचे काम केले त्याबद्दल त्यांना आधार मल्टीस्टेटच्या वतीने 'जीवनगौरव पुरस्कार व कृतज्ञता सोहळा' आयोजित केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने, या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार व साप्ताहिक सांजपाखरूचे संपादक अशोकराव गुंजाळ, जगविख्यात पखवाज वादक उद्धवराव बापू आपेगावकर यांच्यासह आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल, संचालक तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे व सेवानिवृत्त प्रा.दादाराव धाकडे, ज्योतीराम (अण्णा) शेप आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी करताना संस्थेच्या वार्षिक कार्याचा आढावा घेतला. ही संस्था म्हणजे सामाजिक जाणिवा लक्षात घेऊन काम करणारी संस्था असल्याचे सांगत १०० कोटी रूपयांच्या ठेवी जमा करण्यात यश आल्याचे सांगितले व येणाऱ्या काळात सर्व संचालक व सर्व ग्राहक सभासदांचा विश्वास संपादन करीत मोठी भरारी घेण्याचा संकल्प ॲड.सुनील सौंदरमल यांनी बोलून दाखवला. प्रास्ताविकानंतर महागायक सुभाष शेप यांना आधार मल्टीस्टेट कडून दिला जाणारा 'जीवनगौरव पुरस्कार' पद्मश्री व जगविख्यात नेत्रतज्ञ डॉ.तात्याराव लहाने व मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप हे सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ आणि सुभाष शेप यांना भर पेहराव तर त्यांच्या अर्धांगिनी सौ.सुनितातार्इ यांना साडी, चोळी असे होते. यावेळी सभागृह पूर्णतः भारावून गेले. कारण, तो सन्मान प्रत्येकाला माझाच सन्मान आहे असे चित्र त्या ठिकाणी निर्माण झाले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते आधार मल्टीस्टेटच्या आधार मल्टीस्टेटचा वार्षिक अहवाल सन २०२४-२५ चे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात ज्यांनी सुभाष शेप यांना संगीताचे धडे दिले असे त्यांचे गुरूवर्य पांडुरंग देशपांडे व सौ.राणीताई देशपांडे या देशपांडे दांम्पत्याचा सत्कार पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ज्येष्ठ संपादक अशोकराव गुंजाळ यांनी सुभाष शेप व त्यांचे वडील ज्योतिराम (अण्णा) शेप

# शिवदास थळकरी यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक केज तालुका अध्यक्षपदी निवड

केज/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक आघाडीच्या संघटनात्मक बांधणीस गती देण्यासाठीनुकतीच केज तालुक्यात नवीन पदनियुक्ती करण्यात आली.शिवदास उमाकांत थळकरी यांची युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या केज तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवदास थळकरी हे सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय राहिले असून युवकांना राजकारणात व समाजकारणात सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.पक्षाच्या विचारधारे प्रति निष्ठा ठेवून त्यांनी विविध स्तरांवर काम केले. असून त्यामुळेच त्यांच्या वर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीनंतर थळकरी यांनी पक्षश्रेष्ठीं प्रती कृतज्ञता व्यक्त केली तसेच आगामी काळात केजतालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद अधिक वाढविण्यासाठी व युवकांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे



सांगितले.दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल तालुक्यातील पक्षाचे कार्यकर्ते,पदाधिकारी व युवकांनी आनंद व्यक्त केला असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या नियुक्ती मुळे केज तालुक्यातील युवकांमध्ये नवचैतन्य संचारेल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# परळीत दहशत निर्माण करुन दादागिरी करणाऱ्या एका धोकादायक गुंडाची थेट हर्सल कारागृहात रवानगी

बीड/ प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्ययासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत भापोसे यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कारवाई करण्याचे योजिले आहे. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन भाप्रसे यांची खंबीर साथ लाभली आहे. त्या अनुषपांने पो.अ. बीड यांचे सुचनेवरुन पो.नि. श्री. रघुनाथ नाचण पोलीस ठाणे परळी शहर यांनी दिनांक ११.०७.२०२५ रोजी इसम नामे शुभम दशरथ जाधव वय ३२ वर्षे रा. नैकोटा ता. सोनपेठ जि. परभणी ह.मु. विद्यानगर परळी वै. ता. परळी जि. बीड याचे विरध्द चझऊ- कायद्याअंतर्गत थेट हर्सूलच्या कारागरात रवानगी करण्यात आली आहे.

सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे परळी शहर व सोनपेठ येथे खुनाचा प्रयत्न करणे, अपहरण करणे, गंभीर दुखापत करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे वगैरे गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी २२ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहे. तसेच नमुद इसमावर त्याने आपली वर्तनुक सुधारावी म्हणुन यापुर्वी एक वेळा प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालुच ठेवुन होता. त्याची परळी शहर व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता. सदर प्रकरणात जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी दिनांक



१८.०८.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्मुल कारागृह छ. संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले आहे. त्यावरुन पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.स्टे. परळी शहर व पो. नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या, त्यावरुन गोपणीय खबऱ्याच्या आधारे पोनि शिवाजी बंटेवाड यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फतीने आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी सदर इसमास परळी शहरातुन ताब्यात घेऊन पो. स्टे. परळी शहर येथे हजर केले. त्यांनतर पो. नि. परळी शहर यांनी सदर इसमास आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी १५.५२ वा, कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन त्यास योग्य पोलीस बंदोबस्तात हर्मुल कारागृह, छ. संभाजीनगर येथे स्थानबध्द करण्यासाठी रवाना केले.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत भापोसे, अपोअ बीड, श्री चेतना तिडके, उपविपोअ अंबाजोगाई श्री. ऋषीकेश शिंदे (अपोअ) पो.नि. श्री शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. रघुनाथ नाचण, सपोनि नितीन गड्डुवार, पोह किशोर घटमाळ पंडीत पांचाळ, सर्व पो.स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, गोविंद भताणे, रामचंद्र केकाण, सचिन आंधळे, बिबीषण चव्हाण सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहादर धोकादायक गुंडावर तसेच मटका, लॉटरी जुगार खेळाणाऱ्या व खेळविणाऱ्या जास्तीत जास्त चझऊ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत भापोसे यांनी दिले आहेत.

## केंद्रीय रस्ते विकास आणि परिवहन मंत्री मा. नितीनजी गडकरी साहेब यांची भेट घेऊन

# आष्टी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग विकासकामांबाबत सविस्तर चर्चा आमदार सुरेश धस

पाटोदा (प्रतिनिधी)

केंद्रीय रस्ते विकास आणि परिवहन मंत्री मा. नितीनजी गडकरी साहेब यांची दिल्लीत भेट घेऊन आष्टी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करून आमदार सुरेश धस यांनी भेट घेतली या भेटीदरम्यान विशेषतः राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ (पैठण - पंढरपूर पालखी मार्ग) या शिरूर (का.) ते खर्डा पॅकेज टप्प्यातील अपूर्ण कामे व भूसंपादनाशी संबंधित मुद्दे मांडण्यात आले. या टप्प्यातील शिरूर (का.) तालुक्यातील घोगस पारगाव, माळेगाव (च.), उकिर्डा (च.), दहिवंडी, शिरूर (का.), राक्षसभुवन तसेच पाटोदा तालुक्यातील कारेगाव, चुंबळी, पाटोदा, पारगाव घु.



आणि आनपटवाडी या गावांचा समावेश आहे. या मार्गाचे काम २०१४ साली मंजूर झालेले असून अपूर्ण कामे व भूसंपादनाची प्रकरणे तातडीने मार्गी लागावीत यासाठी सुधारित मान्यता व वाढीव निधीची आवश्यकता असल्याबाबत मा. गडकरी साहेबांकडे आमदार धस यांनी विनंती केली.तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१ (अहिल्यानगर - धानोरा - कडा - आष्टी - जामखेड - बीड) या मार्गावरील अहिल्यानगर ते साबलखेड (टप्पा १) आणि आष्टी ते चिंचपूर (टप्पा २) या रस्त्यावरील पुलांच्या बांधकामांबाबत विनंती करताना, मौजे वाघळूज, कडा, शेरी (बु.), जळगाव, कासारी, आष्टी, पांढरी चिंचपूर येथे होणारे पूल पूल कम बंधारा या स्वरूपात बांधण्यात यावेत, अशी मागणी ठेवली. यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहून जाणारे पाणी रोखले जाईल आणि परिसरातील शेतीसाठी सिंचनक्षेत्र वाढण्यास मदत होईल.याशिवाय साबलखेड ते आष्टी, चिंचपूर ते जामखेड आणि सौताडा घाट ते सौताडा गाव या सुरू असलेल्या टप्प्यातील अपूर्ण रस्ते व पुलांची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच सर्व प्रलंबित कामे वेळेत मार्गी लागावीत यासाठी संबंधित विभागीय अधिकारी व कंत्राटदार यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याबाबतही आमदार धस यांनी विनंती केली.

# श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी सावळदबारा येथे उत्साहात

सावळदबारा ।प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्साहात साजरा करण्यात आली. सावळदबारा गावातील श्री चक्रधर स्वामी मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. शनिवार रोजी श्री चक्रधर स्वामी मंदिर पासुन पालखी काढण्यात आली होती. घरासमोर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. सावळदबारा गावासह परिसरातील भाविक भक्तांनी पालखीचे दर्शन घेतले.सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामींचे मंदिर आहेत भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. १५ ऑगस्ट रोजी मंदिरात आकर्षक सजावट केली होती शनिवारी रोजी श्री चक्रधर स्वामी मंदिर पासुन पालखी काढण्यात आली होती भाविक भक्तांनी दर्शन घेतले महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते

संध्याकाळी दहीहंडी फोडण्यात आली, यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते, दिलीप पुजारी, गोपीनाथ पुजारी,गोकुळसिंग राजपूत, मधुकर पुजारी,अरुण पुजारी, अभय पुजारी, पोलीस पाटील विलास आप्पा कुळी,सुधाकर साळुके,मधुकर गावडे, आनंदा आप्पा चोपडे, एकनाथ सपाटे,पांडुरंग आंजुळे, संदीप आप्पा काळे, योगेश साळुंके, राहुल साळुके, विशाल खडके, शुभम पुजारी,गोपाल खडके, रमेश कळसकर, संदीप राजपूत, तुकाराम खिरडकर , मयूर रावळकर, जीवन देशपांडे, गणेश अगायते, दीपक गावडे, ईश्वर काळे, सागर कुळी, योगेश खैरे, मुकेश रावळकर, गणेश




काळे, आदी होते यावेळी फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार मिरखा तडवी,शिवदास गोपाळ,याचा बंदोबस्त होता

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात अँटीरॅगिंग सप्ताह उत्साहात साजरा

मंठा - विद्यापीठ अनुदान आयोग भारत सरकार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर यांच्या आदेशानुसार १२ ते १८ ऑगस्टदरम्यान स्वामी विवेकानंद महाविद्यालयात अँटीरॅगिंग सप्ताह साजरा करण्यात आला. रॅगिंग रोखण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये कायदेशीर जागृती निर्माण करण्यासाठी या आठवड्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




सप्ताहाच्या प्रारंभी आयोजित कार्यशाळेत अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. माणिकराव थिटे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून मंठा पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक संतोष माळगे उपस्थित होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डॉ. सुधाकरराव जाधव, प्रा. डॉ. सदाशिव कमळकर, संभाजीराव तिडके तसेच सप्ताहाचे संयोजक प्रा. डॉ. आर. एन. आल्टे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना माळगे यांनी सांगितले की, रॅगिंग हा दखलपात्र गुन्हा असून दोषींना दोन वर्षांची शिक्षा व दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला जाऊ शकतो. तसेच अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही शिक्षण संस्थेत प्रवेश मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी रॅगिंगपासून दूर राहून आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

समारोप करताना प्राचार्य डॉ. थिटे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिस्त पाळावी, गैरवर्तन होणार नाही याची खबरदारी घ्यावी व पालकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन आदर्श वर्तन करावे. महाविद्यालयात सीसीटीव्ही देखरेख व अँटीरॅगिंग समिती असल्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण मिळते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पांडुरंग नवल यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दक्षता देशमुख यांनी केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# परप्रांतीयाचे अपहरण करणारे पाथर्डीतील दरोडेखोर पोलिसांच्या जाळ्यात

कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांची धडाकेबाज कारवाई

अहिल्यानगर/प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी -दिनांक १६ ऑगस्ट रोजी पाथर्डी शहरामध्ये परप्रांतीय तिन व्यक्ती नामे अजय सिंग रजसिंग नायक, सुनील कुमार छत्रसिंग नायक, यादशिंग बालकिशन नायक हे त्यांच्या मारुती सुझुकी गाडी मधून गॅस शेगड्या, होम थेटर, कुलर अशा गृह उपयोगी वस्तू विक्री करत होते आरोपीने त्यांच्या गाडीचे अपहरण करून व दमदाटी व शिवीगाळ करून त्यांना मारहाण केली व त्यांच्या खिशातील रोख रक्कम, दोन मोबाईल फोन, व गृह उपयोगी वस्तू असा ४९ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने काढून घेतला. तसेच आरोपीने साक्षीदार यांना फिर्यादीच्या गाडीमध्ये बसून पाथर्डी येथून अहिल्यानगर मार्गे पलायन करीत असताना गाडी भरधाव वेगाने समोरून येणाऱ्या वाहनावर जाऊन धडकली. गाडी नंबर एम. एच. १४ जे. आर. ३६ ९७ त्यामुळे गाडीमधील लोकांना गंभीर दुखापत झाली आहे.

यानंतर घटनेची माहिती मिळताच घटनेचे गांभीर्य पाहून पाथर्डी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक विलास पुजारी साहेब यांनी चार वेग वेगळी पथके तयार करून गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेतला असता यावेळी आरोपी अंकुश नवनाथ मडके- वय ३६ वर्ष राहणार शिक्षक कॉलनी, पाथर्डी यास ताब्यात घेतले, व त्याच्याकडून इतर आरोपीची नावे पोलिसांना मिळाली तदनंतर पोलिसांनी उर्वरित आरोपीचा शोध घेतला असता शुभम अंबादास कराड- वय २३ वर्ष राहणार शिक्षक कॉलनी , तालुका पाथर्डी व केतन दिगंबर जाधव वय- २९ राहणार शिक्षक कॉलनी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर ही आरोपी पोलिसांना मिळाले. पोलिसांनी त्यांना न्यायालयात



हजर केले असता त्यांचे दिनांक २० ८ २०२५ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाले असून उर्वरित चौथा आरोपी सुहास काशिनाथ ढाकणे वय- ३४ राहणार एडके कॉलनी, तालुका पाथर्डी यास अटक केली असून पुढील तपास चालू आहे. सदरील गुन्हा घडल्यानंतर २४ तासाच्या आत आरोपी पाथर्डी पोलिसांनी गजाआड केले आहे. उर्वरित आरोपी व मुद्देमालाचा शोध पोलीस घेत आहेत. या गुन्ह्यातील आरोपी केतन दिगंबर जाधव हा सराई गुन्हेगार असून त्याच्यावर पाथर्डी पोलीस स्टेशन मध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्ह्याची कारवाई माननीय सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, माननीय वैभव कलबुर्म, अप्पर पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, मा. उगले साहेब शेवगा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी ,पो.स.ई. विलास जाधव, संदीप ढाकणे, महादेव गुट्टे, निवृत्ती आगरकर, नितीन दराडे, बाबासाहेब बडे, सागर बुधवंत, संजू जाधव, इजाज सय्यद, संदीप बडे, अल्ताफ शेख, सुरेखा गायकवाड, ज्ञानेश्वर ईलग, या पोलीस पथकाने यशस्वी कार्यवाही केली. घटना घडल्यानंतर पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी अवघ्या २४ तासाच्या आत आरोपीच्या मुसक्या आवळल्या त्यामुळे पाथर्डी तालुक्यात

# पुण्यातील तरुण मुलींवर लैंगिक छळ करणाऱ्या पोलिसांवर त्वरित कार्यवाही करा

## एकल महिला संघटनाची एकमुखी मागणी

बीड /प्रतिनिधी

पुण्यातील तीन मुलींवर त्याचा कोणताही गुन्हा नसताना पोलिसांनी त्यांच्या घरात घुसून मारहाण केली. मोबाइल व घराची झडती घेतली. त्यांना दिवसभर डांबून ठेवले व शारीरिक मानसिक छळ केला.निवृत्त पोलीस उपनिरीक्षक असणाऱ्या छ संभाजीनगर मधील पिढीतेच्या सासर्याने या मुलींच्या घरी व कामाच्या ठिकाणी पोलीस पाठवून त्या मुलींना धमकावले. व बेकायदेशीरपणे पुणे पोलिस स्टेशनमध्ये नेऊन त्यांना मारहाण करण्यात आली. तसेच जातीवाचक शिव्या दिल्या अशा प्रकारच्या अमानुष वागणूक तीही पोलिसांकडून मिळणे ही अतिशय गंभीर गोष्ट आहे, असे पदाचा गैरप्रकार व हितसंबंधीयाकडुन पोलीस कर्मचाऱ्यांवर दबाव आणणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करावी अशी मागणी एकच संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की,या संपूर्ण प्रकरणात पॉलिसी कार्यवाही च्या नाहक बळी ठरलेल्या व्यक्तींचा सन्मान पूनरस्थापित झाला पाहिजे त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गृहमंत्री, मुख्यमंत्री यांनी तात्काळ कार्यवाही करावी.,जातीवाचक शिविगाळ करणाऱ्या पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यावर अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ व भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे दाखल करावेत., सासरच्या छळमुळे आश्रयासाठी बाहेर आलेल्या कौटुंबिक हिंसाग्रस्त महिलेस संरक्षण व सुरक्षितता ची हमी द्यावी., आपल्या पूर्वीच्या पदाचा गैरवापर करत पोलिस यंत्रणेचा वापर करणाऱ्या सदर महिलेच्या सासर्यावर कठोर कारवाई व्हावी.,तरुणींच्या नोकरी व राहते घरी आर्थिक व सामाजिक दुजाभाव या पासून संरक्षण चा अधिकार शासनाने अबाधित राहील याची काळजी घ्यावी, या दंडशाही मुळे भोगाव्या लागणाऱ्या सर्व त्रासासाठी पोलीस प्रशासनाकडून या तरुणींची बिनशर्त माफी मागितली जावी.




झालेल्या घटनेचा एकल महिला संघटना निषेध करत आहे तसेच पिढीत मुलींना त्वरित न्याय देऊन संबंधित पोलिसांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी संघटना च्या वतीने करण्यात आली असून निवेदनावर रुक्मिणी शिल्पा पंडित,तेजस्विनी उबाळे, ललिता सावंत, तारा घोडके, उर्मिला गालफडे, प्रजावती जोगदंड, मंगल कानडे, कौशल्या कळसुले, रुक्मिणी नागापुरे संजीवनी पखाले यांच्या सह्या आहेत.

बीड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात महिला ग्रामसभा घ्या

बीड जिल्ह्यात एकल महिला संघटना ही तळागाळातील पाच हजार महिलांच्या सोबत काम सुरू असून काम करत असताना महिलांच्या समस्या दूर करण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, महिला संपत्ती अधिकार मुद्यांवर काम करत असताना एकल विधवा, परितक्तता, घटस्फोट झालेल्या,निराधार, वृद्ध महिला, अपंग महिलांचे असंख्य समस्या आहेत आणि त्यांचे मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी महिलांना ग्रामपंचायतच्या योजनांचा लाभ घेता यावा, महिलांचा सक्रिय सहभाग असावा, पूर्वी महिला ग्रामसभा घेणे बंधनकारक केले आहे. जेणेकरून महिला स्वतः पुढे येऊन प्रश्न मांढतील फक्त महिलांचा गावाच्या विकास कार्यक्रमात मर्यादित सहभाग राहू नये तर त्यांनी निर्णय प्रक्रियेत पुढे असावे. त्यांची क्षमता वाढावी या हेतूने कर्तव्याची खऱ्या अर्थाने जाणीव होणार आहे. या साठी महिला सभा अतिशय खूप महत्वाचे आहे.

ऑगस्ट मध्ये सर्वसाधारण ग्रामसभेत महिलांचे मूलभूत प्रश्न, शासकीय योजना, रोजगार हमी योजनांचे नियोजनबाबत चर्चा होऊन आराखड्यास मंजुरी संबंधित सभेत ठराव ठेवणाऱ्या विषयावर चर्चा होण्यासबंधी महिला सभा घेण्यात यावी व तसेचे तसेच मुद्दे ग्रामसभेत पारित करून सर्वसाधारण ग्रामसभेत ठरावात नमूद करावे यासाठी एकल महिला संघटना बीड जिल्हा वतीने संबंधित यंत्रणेला तसे पत्र काढावेत यासाठीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले यावेळी एकल महिला संघटनाच्या संजीवनी पखाले, ललिता सावंत, तेजस्विनी उबाळे, शिल्पा पंडित, तारा घोडके, प्रजावती जोगदंड, उर्मिला गालफडे, मंगल कानडे, कौशल्या कळसुले, रुक्मिणी नागापुरे यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# बार्शीनाका रेल्वे स्टेशनचे काम त्वरीत सुरू करा- खुर्शीद आलम

## उपमुख्यमंत्रीने रेल्वे स्टेशन कृती समितीचे निवेदन लक्षपूर्वक वाचले

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार १५ ऑगस्ट निमित्ताने बीडच्या दौऱ्यावर आले होते या यावेळी बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री यांना भेटून निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की बीडचे रेल्वे स्टेशन बार्शीनाका इमामपूर रोड प्रकाश आंबेडकर नगर येथेच मंजूर आहेत असे असतानाही सदर रेल्वे स्टेशन पालवन येथे म्हणजे बीड शहराच्या ७ ते ८ कि.मि. दुर बांधण्यात आले आहेत, त्यामुळे लोकांची गैरसोय झाली आहे, पालवन रेल्वे स्टेशनवरून नगरला जाण्यासाठी पन्नास रुपये लागणार आहेत तर बीड शहरातून पालवण स्टेशनवर जाणेसाठी शंभर ते दीडशे रुपये खर्च होणार आहेत म्हणून पालवन रेल्वे स्टेशन नागरिकांना परवडणारे नाहीत म्हणून बार्शीनाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन थांबा चे काम त्वरित सुरू करावे कारण बार्शी नाक्यावरून शेतकऱ्यांना आणि सर्वच नागरिकांना नवा आणि जुना मोंढा. कृषी उत्पन्न बाजार समिती. एमआयडीसी. आठवडी बाजार. आडत मार्केट. बस स्टॅन्ड. जिल्हाधिकारी कार्यालय. तहसील कार्यालय. समाज कल्याण ऑफिस. जिल्हा रुग्णालय. एसपी ऑफिस. जिल्हा न्यायालय. शासकीय दूध डेरी. महिला रोगणालय. जिल्हा क्रीडांगण आणी जवळपास ९५ टक्के शाळा महाविद्यालय हे बार्शीनाका इमामपुररोड रेल्वे स्टेशनवरून जवळ आहेत तसेच चारो दिशेने नॅशनल हायवे असल्यामुळे



बार्शी रेल्वे स्टेशन वर ट्राफिक होणार नाही विशेष म्हणजे बार्शीनाका इमामपुर रेल्वे स्टेशनवर रेल्वेत बोर्डाने यापूर्वीच जमीनी खरेदी करून चार मोठ्या बिल्डिंग तैय्यार केलेले आहेत म्हणूनच एकदम कमी खर्चयात कम खर्चात रेल्वे स्टेशन होईल म्हणून बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन (रेल्वे थांबा)चे काम त्वरित सुरू करावे अशी नम्र विनंती बार्शी नाका इमामपुर रोड रेल्वे स्टेशन कृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली असता उपमुख्यमंत्री दादांनी सदर निवेदन लक्षपूर्वक वाचले आहे, यावेळी संपादक गम्मतभाऊ भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले असुन बार्शीनाका रेल्वे स्टेशन कृती समितीचे कार्य अध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात, गोरख शिंगण,नगरसेवक अमोल पऊड, शेख अखील भाई, शनेश्वर गायकवाड,शेख युनुस भाई, आदी मान्यवर उपस्थित होते,

# केज तालुक्यात आरोग्य विभागाचा अजबच प्रकार

## कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी महिलांना करु लागले बळजबरी

केज ।प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य केंद्र विडा परिसरातील गावागावांत आशा स्वयंसेविका घराघरात जाऊन कुटुंबातील महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी सक्ती करु लागल्या आहेत. आशा स्वयंसेविका कुटुंबातील महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त करण्याबरोबरच बळजबरी पण करु लागल्या आहेत. महिलांचे फोटो काढणे सह्या घेणे प्रकार सुरू केला आहे. त्यामुळे विडा परिसरात महिला दडपणाखाली आल्या आहेत.

आशा स्वयंसेविकांना गावातील महिला सही देत नाहीत म्हटले तर त्या म्हणतात तुमच्या सर्व योजना सरकार बंद करणार आहे. हा अजबच प्रकार पाहून महिला घाबरून गेल्या आहेत. या प्रकरणी काय गोड बंगाल आहे हे आरोग्य विभागाने तातडीने पष्ट केले पाहिजे असे या भागातील लोक म्हणतं आहेत.आज लहुरी आणि परिसरातील गावागावांतून लोक म्हणतं आहेत की हा प्रकार तातडीने थांबला पाहिजे सध्या सगळीकडे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या या प्रकरणी लोक दडपणाखाली आले आहेत. तरी तालुका वैद्यकीय अधिकारी केज आणि विडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी आशा स्वयंसेविकांना हा प्रकार थांबविण्यास तातडीने सुचना द्याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या विषयात जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी लक्ष वेधले पाहिजे असे हि लोक बोलत आहेत.

# डॉ. महेंद्र वैरागे यांचे भारतीय सामाजिक समस्या हे पुस्तक विद्यार्थ्यांनी संदर्भ ग्रंथ म्हणून वापरावे - किशोर हंबर्डे

आष्टी (प्रतिनिधी)

डॉ. महेंद्र वैरागे यांचे भारतीय सामाजिक समस्या हे पुस्तक विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते न ठेवता, एक संदर्भ ग्रंथ म्हणून वापरावे असे प्रतिपादन आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे यांनी केले. ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयात आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. ड. बी. डी. हंबर्डे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. सामाजिक वास्तवाची सखोल समज विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी अशा प्रकारचे साहित्य महत्त्वाचे ठरते, असे सांगताना किशोर हंबर्डे म्हणाले,




भारताच्या सामाजिक रचनेतील गुंतागुंतीच्या समस्यांचे विश्लेषण डॉ. वैरागे यांनी अभ्यासपूर्वक आणि सोप्या भाषेत मांडले आहे. त्यामुळे हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर आणि स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.

या ग्रंथात जातीव्यवस्था, लिंगभेद, शिक्षणातील असमानता, बेरोजगारी, दारिद्र्य अशा महत्त्वाच्या विषयांचा वेध घेतला असून, सैद्धांतिक बाबींप्रमाणेच वस्तुनिष्ठ दृष्टिकोनही ठेवण्यात आला आहे. यामुळे केवळ परीक्षेच्या तयारीपुरते नव्हे, तर सामाजिक भान जागृत करण्यासाठीही हे पुस्तक मोलाचे ठरते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे, उपाध्यक्ष दिलीप वर्धमाने , सचिव अतुल शेठ मेहेर, कोषाध्यक्ष डॉ. गणेश पिसाळ, प्रा व्ही. एल. शिंदे, प्रा. महेश चवरे, रिद्धी किशोर हंबर्डे, प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, उपप्राचार्य बाबासाहेब मुटकुळे, प्रा. अविनाश कंदले, पिंपळेश्वर इंग्लिश स्कूल प्राचार्य सायली हंबर्डे, विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी आणि अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या पुस्तकाची उपयुक्तता मान्य करत त्याचा अभ्यासक्रमात वापर करण्याचा संकल्प केला.

# ईद-ए-मिलादुन्नबी जयंती समितीच्या अध्यक्षपदी सय्यद सलीमबापू

## निवड समितीने तिसऱ्यांदा केली निवड

माजलगाव ।प्रतिनिधी

५ सप्टेंबर रोजी साजऱ्या होण्याऱ्या ईद-ए-मिलादुन्नबी जयंतीनिमित्त अहले सुन्नतवल जमाअत कमीटी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते सय्यद सलीमबापू यांची निवड करण्यात आली आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली उत्सवाच्या तयारीस प्रारंभ झाला असून,जुलुस,धार्मिक व सामाजिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समिती सक्रिय झाली आहे.दरम्यान सलीमबापू यांच्या अध्यक्षतेखाली विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येणार असून, त्यांची ही निवड समितीकडून तिसऱ्यांदा करण्यात आली आहे.



इस्लाम धर्माचे सर्वश्रेष्ठ हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती म्हणून ईद-ए-मिलाद साजरी केली जाते.ह.मोहम्मद पैगंबर हे अल्लाहचे अंतिम प्रेषित होते.इस्लामच्या धारणेनुसार अल्लाहने त्यांच्या मार्फत कुराण हा धर्मग्रंथ लोकांपर्यंत पोहोचवला.इस्लाम मध्ये ईद-ए-मिलाद हा सर्वात मोठा दिवस मानला जातो.हजरत मोहम्मद पैगंबर यांनी त्यांच्या आयुष्यात नेहेमीच शांततेचा संदेश दिला आहे.त्यांच्या या शिकवणीची आठवण त्यांनी दिलेल्या कुराणची शिकवण ही सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात राहावी आणि त्यांनी आपल्या जीवनात ती अमलात आणावी यासाठी ईद मिलादुन्नबी साजरी केली जाते. यानिमित्त शहरातील आझाद नगर भागात १७ ऑगस्ट रोजी बैठक पार पडली.यावेळी ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त साजरी होणाऱ्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी या भागातील ज्येष्ठ नेते सय्यद सलिमबापु यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.दरम्यान ईद ईद मिलादुन्नबी निमित्त शहरात जुलूस मिरवणूक काढण्यात येणार आहे.मज्जीद मध्ये धार्मिक प्रवचन करण्यात येणार आहे.मिठाई, सरबत वाटप केली जाणार आहे.

त्याचप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमाची मेजवानी नागरिकांना अनुभवास मिळणार आहे.जशने मिलाद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन जयंती अध्यक्ष सय्यद सलिमबापु,सय्यद सिराजोद्दीन कादरी.सय्यद युसुफोदीन कादरी आगा खान साहब.शेख महेबुब. शेख मुस्तकीम.सय्यद रईसोद्दीन कादरी.मिर्झा महेमुद.शेख आसेफ भाऊ सय्यद रहीम फिटर.सय्यद समीर.सय्यद मुदस्सीर.शेख हारून फिटर.शेख अख्तर.शमशेर पठाण.सय्यद तौफिक.अहले सुन्नतवल जमाअत कमीटी माजलगाव कडुन सय्यद अली खतीब आसेफ.शेख महेबुब.सय्यद शफिक भाऊ.शेख इलियास.शेख गुलाब.शेख चुन्नु. सय्यद तौफिक कादरी.सय्यद फारुख अण्णा यांनी केले आहे.

# शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी - राजेंद्र मस्के

बीड ।प्रतिनिधी

मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला. परंतु १३ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील १७ महसूल मंडळांत अतिवृष्टीची झाल्याची नोंद समोर आली आहे. अतिवृष्टीचा जिल्हाभरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. शेत पिके, शेतजमीन, तर अनेक ठिकाणी रस्ते व पुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घ्यावी व तातडीने पंचनामे करून शासनाने मदत जाहीर करावी. तसेच ग्रामीण भागातील रस्ते पुल सुधारणांसाठी विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे.

संपूर्ण जिल्हाभरात कोसळलेल्या अतिवृष्टी मुळे कापूस सोयाबीन, तूर ,उडीद, मूग, बाजरी या सारख्या उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते झाले. असून काही ठिकाणी फळबागांचे ही नुकसान झाले आहे. शेत जमिनी वाहून गेल्या तर काही ठिकाणी जलमय परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले. ग्रामीण भागातील





रस्ते व पूलांचे अतोनात नुकसान झाले. रस्ते व पुलांच्या नुकसानी मुळे रहदारीचा प्रश्न निर्माण होणार आहे.यावर्षी खरीपाची जवळपास शंभर टक्के पेरणी झालेली आहे.विम्याचा खर्च जास्त असल्याने अनेक शेतकरी विम्या पासून वंचित आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पंचनामे करून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणीही केली आहे.

# गंगाखेड तालुक्यातील बाधित गावानां तहसीलदारांची भेट

गंगाखेड: गंगाखेड तालुक्यातील पावसाने बाधित गावाचा तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे यानी सोमवार १८ पाहणी दौरा करुन अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाल्याची नोंद शासनाला सादर करण्यात आलेल्या अहवालातून समोर आली आहे. यातच डोंगरपिंपळा शिवारात असलेला छोटा बंधारा फुटल्याने शेती पिकाचे नुकसान झाले आहे. तर गौडगाव शिवारातील शेतात पाण्याचे तळे साचल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येपासून गंगाखेड संपुर्ण तालुक्यात सतत धार पाऊस पडत असुन सोमवार १८ ऑगस्ट रोजीच्या अहवालानुसार गंगाखेड विधानसभा मतदार संघातील गंगाखेड तालुक्यात असलेल्या माखणी मंडळात ९०.८ मिमी., राणीसावरगाव मंडळात ८७.३ मिमी, पिंपळदरी मंडळात ९५ मिमी अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे. गंगाखेड तालुक्यातील माखणी मंडळात अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाल्यामुळे तालुक्यातील मौजे डोंगरपिंपळा येथील नदीवर असलेला बंधारा फुटून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी गेल्याने शेती पिकांचे नुकसान झाल्याची तक्रार तहसील कार्यालयात प्राप्त होताच तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे, नायब तहसीलदार मो. अजीम, मंडळ अधिकारी शंकर राठोड, चंद्रकांत साळवे, ग्राम महसूल अधिकारी तलाठी चंद्रकांत शेवटे, सतिश गलांडे आदींनी सोमवार रोजी डोंगरपिंपळा येथे भेट देऊन पाहणी केली आहे.



# कार पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली; एक बेपत्ता, एकाचा थरारक बचाव

देगलूर : तालुक्यातील गवंडगाव येथील दोन युवकांवर रविवारी उशिरा रात्री भीषण आपत्ती कोसळली. उदगीरहून परत येत असताना मौ धडकनाळ (ता. उदगीर) येथील पुरग्रस्त नाल्यातून कार नेण्याचा प्रयत्न केला असता, गाडी पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेली. या अपघातात गवंडगावचा महेबूब अहमद पिंजारी (३३) हा युवक बेपत्ता झाला असून त्याचा सोबती नारायण नागेंद्र ईबीते (२८) याने झाडाला धरून अख्खी रात्र झुंज देत जीव वाचवला.



रात्री अकरा वाजता घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पाण्याचा जोरदार प्रवाह सुरू असतानाही दोघांनी कार पुढे नेण्याचा प्रयत्न केला; मात्र अंदाज न आल्याने गाडी थेट पाण्यात वाहून गेली. दरम्यान, प्रसंगावधान दाखवत नारायण ईबीते यांनी झाडाला धरून आपला जीव वाचवला. त्यांनी संपूर्ण रात्र झाडावर लटकून काढली. सोमवारी सकाळी आठच्या सुमारास स्थानिकांच्या मदतीने त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

मात्र, महेबूब पिंजारी हा पाण्यात वाहून गेला. विशेष म्हणजे, त्याला पोहता येत नसल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. घटनेनंतर प्रशासन आणि स्थानिकांनी दिवसभर शोधमोहीम राबवली. मात्र, सोमवारी सायंकाळपर्यंतही त्याचा शोध लागलेला नव्हता.या दुर्दैवी घटनेमुळे गवंडगाव परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांनी अशा वेळी नाल्यांवरून वाहन नेण्याचे टाळावे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# १२ वीचे गणित कळले तरच आयुष्याचे गणित सुटेल - मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत

## गोव्यातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, तांत्रिक, फॉरेन्सिक, आयुषसारखी दालने खुली

पणजी ।प्रतिनिधी

राज्यातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम हा महत्त्वाचा उपक्रम आहे. योग्य मार्गदर्शन आणि तयारीमुळे, विद्यार्थी त्यांच्या करिअरच्या प्रवासात यशस्वी होऊ शकतात, असे मत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे डिचोली आणि सत्तरीतील १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी रवींद्र भवन, साखळी येथे आयोजित केलेल्या UNOCUE GOA करिअर नेव्हिगेटर कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते.

या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, सध्याच्या काळात JEE आणि NEET या दोन परिक्षा देणे आवश्यक आहे. या परिक्षांमधून विद्यार्थ्यांना त्यांची पात्रता किती आहे, आपण काय शिकलोय हे सहज लक्षात येईल. यामुळे सर्वांनी या दोन परिक्षा द्याव्यात असे माझे मत असल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी मांडले. १२ वीचे गणित कळले नाही तर आयुष्याचे गणित सोडवताच येणार नाही असा आपुलकिचा




सल्लाही त्यांनी यावेळी दिला.या कार्यक्रमासाठी UNOCUE चे धवल गांधी, शिल्पा मेहेरा, SCERT च्या मेघना शेटगावकर, सरिता गाडगीळ तसेच उच्च माध्यमिक आणि १२ वीचे विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग उपस्थित होते.

वैद्यकिय अभ्यासक्रमाची सुविधा

ज्या विद्यार्थ्यांना वैद्यकिय क्षेत्रात करिअर करायचे आहे अशांसाठीही गोव्यात चांगल्या सुविधा आहेत. नर्सिंगसाठी गोव्यातील मुलांसांठी ४०० सीट उपलब्ध आहेत, फिजीओथेरेपी कॉलेज, नॅचरोपेथीक आणि योगीग सायन्स कॉलेज, बॅचलर ऑफ फॉरेन्सिक सायन्स, आयुष कॉलेज ही देशातील महत्वाची कॉलेज् आज गोव्यात उपलब्ध आहेत. NIT आणि IIT कॉलेजमध्ये गोव्यातील मुलांसाठी ५०% जागा उपलब्ध आहेत, मात्र दुदैवाने याबाबत मुलांना माहिति नाही. त्यामुळे करिअर समजून घ्या, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

### स्पर्धा परीक्षेसाठी प्रयत्नशील रहा..

फक्त डॉक्टर, इंजिनिअर एवढेच करिअर नाही तर, आत्तापासून जीपीएससी आणि यूपीएससीची तयारी करावी. तुमची आर्थिक परिस्थिती नाही म्हणून तुम्ही मागे राहू नये, सरकार पूर्ण मदत करण्यासाठी तयार आहे. पुढील वर्षापासून एमबीबीएसच्या मार्गदर्शनासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे एक सेल उघडण्याची योजना असून आत्ताच शिक्षणासाठी सीएम स्कॉलरशिप पोर्टलवर अप्लाय करा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. एससी, एसटी, ईडब्ल्यूएस कॅटेगरिसह ज्यांचे पालक खासगी क्षेत्रात काम करतात अशांना सुद्धा स्कॉलरशिप मिळाणार आहे. तुम्ही जी फी भरता तेवढी सर्व फी तुम्हाला स्कॉलरशीपद्वारा परत मिळणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.




# जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांच्या हस्ते मांजरा धरणाचे जलपूजन संपन्न

केज/प्रतिनिधी

धनेगाव येथील केज सह अंबाजोगाई,लातूर येथील जलवाहिनी समजले जाणारे मांजरा धरण पुर्ण क्षमतेने भरले आहे.हा एक सर्व शेतकरी बांधवांसाठी आनंदाची बाब असून शेतकरी बांधवावर निसर्गाची कृपा कायम रहावी असे उद्गार रमेशराव आडसकर यांनी धनेगाव येथील मांजरा धरणाच्या जलपूजन करते वेळी व्यक्त केले.मागील काही दिवसांत भरपूर पाऊस झाल्याने अनेक शेतकर्यांचे पिक गेले आहेत.त्यांचे पंचनामे करणे सुरू आहे. मी स्वतः उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भेटून पिडीत शेतकर्यांना मदत मिळावी यासाठी प्रयत्न करणार आहे.असेही रमेशराव आडसकर यांनी उपस्थित शेतकरी यांना आश्वासन दिले.

तसेच मांजरा धरण भरले आहे. व पाऊस काळ चांगला झाला आहे.त्यामुळे उसाचे पिक चांगले रहाणार आहे.अंबा सहकारी साखर कारखाना परिसरातील सर्व उस नेण्यासाठी तत्पर असून चांगला भाव देण्याची हमी देखील रमेशराव आडसकर यांनी दिली आहे.त्यामुळे शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. मांजरा धरणाच्या जलपूजन प्रसंगी रमेशराव आडसकर यांच्यासोबत अंकुश अण्णा इंगळे कृ. उ.बा.स.सभापती केज, ऋषीकेश भैय्या आडसकर,राजाभाऊ अवताडे रा.कॉ.ता. अंबाजोगाई,बालासाहेब शेप सरपंच,अमर भैय्या पाटील रा.कॉ.पा.ता.अ. केज,संभाजी इंगळे, खोडसे मामा,तपसे, काळदाते यांच्या सह शेतकरी कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या जीवन कार्यावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

शिरूर कासार ।प्रतिनिधी

येथील कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय आणि वांग्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून निबंध मागविण्यात येत आहे. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर: सामाजिक न्यायाचा योद्धा व जयदत्त (अण्णा) क्षीरसागर: सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कार्य या दोन विषयांवर दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पूर्वी ळा-रसश किंवा झऊऋ स्वरूपात आपले हस्तलिखित निबंध ९०९६६८४७६८ या व्हाट्सअप क्रमांक वर पाठवावे असे आवाहन वांग्मय मंडळ अध्यक्ष डॉ. रमेश लांडगे यांनी केले आहे.



आलेल्या सर्व निबंधाचे आयएसबीएन क्रमांक असलेले गौरव ग्रंथ प्रकाशित करणार असून पहिल्या तीन उत्कृष्ट निबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

# बीड जिल्हा वकील संघातर्फे ज्येष्ठ सरकारी विधीज्ञ अँड .उज्वल निकम यांची राज्यसभेवर खासदारपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १८ ८ २०२५ रोजी ज्येष्ठ विधीज्ञ अँड.उज्वल निकम साहेब यांचा राज्यसभेवर खासदारपदी नियुक्त झाल्यामुळे बीड जिल्हा वकील संघाने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता.

या सत्कार समारंभ प्रसंगी अध्यक्ष म्हणून बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सुभाष गुरुलिंग पिसुरे आप्पा हे होते. त्यांनी आपल्या मनोगतातून कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. त्यानंतर निकम साहेबांचा सत्कार बीड जिल्हा वकील संघातर्फे करण्यात आला.त्यांचा सत्कार बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड .सुभाष गुरुलिंग पिसुरे आप्पा तसेच बीड जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष अँड .रघुराज विष्णुपंत देशमुख, सचिव अँड .सुभाष रंगनाथ काळे, सहसचिव अँड .धीरजकुमार कांबळे,कोषाध्यक्ष अँड .योगेश सुभाष टेकाडे तसेच ग्रंथपाल सचिव अँड .सय्यद अजीम खाजा पाशा आणि महिला प्रतिनिधी अँड.मनीषा अर्जुनराव गडकर ( कुपकर ) यांनी सत्कार केला. तसेच अँड .अंबादास सोपानराव जाधव पेडगावकर यांनीही निकम साहेबांचा सत्कार केला.

यानंतर अँड .उज्वल निकम साहेबांनी आपले मनोगत व मार्गदर्शन केले. त्यांनी मनोगतामध्ये सर्व नवोदित विधीज्ञानासाठी मी चांगलं व्यासपीठ तयार करून देणार. तसेच विधीजनाकडे येणारे पक्षकार यांच्याशी विधीज्ञाने प्रामाणिकपणे बोलावे जे खरे आहे ते सांगावे . त्यांचे मार्गदर्शन हे सर्व वकील बंधूसाठी फार प्रेरणादायी ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड .मनीषा



कुपकर गडकर मॅडमनी केले.आज आपण सगळयांनी अशा एका व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला आहे की ज्यांनी न्यायव्यवस्थेत कार्य करून देशाला विश्वास दिला आणि आता राज्यसभेत खासदार म्हणून सेवा करण्याची त्यांना संधी मिळाली आहे. त्यांचा गौरव हा सर्व वकिलांचा गौरव आहे. त्यांची ही यशस्वी वाटचाल देशाच्या लोकशाहीला नवी दिशा देईल याचा आपणास विश्वास आहे असे सूत्रसंचालन अँड.मनीषा गडकर कुपकर महिला प्रतिनिधी यांनी केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बीड जिल्हा वकील संघाचे कोषाध्यक्ष माननीय अँड .योगेश जी टेकाडे सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी बीड जिल्हा वकील संघातील विधीज्ञ व महिलांनी विधीज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# २३ व २४ ऑगस्ट रोजी भावठाणा येथे होणाऱ्या दुसऱ्या मृदगंध साहित्य संमेलनाची तयारी पूर्ण

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

भावठाणा येथे सानेगुरुजी विद्यालयात होणाऱ्या दुसऱ्या मृदगंध साहित्य संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. हे संमेलन आगळे वेगळे होणार असून त्यास साहित्यिक, रसिक व ग्रामस्थानी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष अनिकेत लोहिया यांनी केले आहे.

साहत्य संमेलन ज्या परिसरात होणार आहे, त्यास पूज्य नारायण दादा काळदाते साहित्य नगरी असे नाव देण्यात आले आहे. मंचाला डॉ द्वारकादास लोहिया व प्रवेश द्वाराला ग्रामीण लेखक त्र्यंबक असरडोहकर यांचे नाव देण्यात आले आहे.अंबाजोगाईहून जाणे-येणे करणाऱ्यांसाठी खास मोफत वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी सात ते नऊ या वेळात छ. शिवाजी महाराज चौक (कोर्टाच्या समोर) येथून गाड्या सुटतील व रात्री सात ते नऊ या वेळेत संमेलन स्थळ येथून परत येण्यासाठी गाड्या सुटतील.

अंबाजोगाई तालुक्यातील डॉगरी भागात वापरल्या जाणाऱ्या पुरातन वस्तूंचे एक अनोखे प्रदर्शन साने गुरुजी विद्यालयातील चित्रकार शिक्षक नेताजी यादव हे भरवणार आहेत. असे प्रदर्शन पहिल्यांदा भरत असल्यामुळे ते आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. जाते, शिंका, रवी, इत्यादी घरगुती साधना सोबत शेतीसाठी जुन्या काळात वापरली जाणारी औजारेही प्रदर्शनात मांडली जाणार आहेत.

प्रसिद्ध ग्रामीण लेखक उमेश मोहिते हे संमेलनाध्यक्ष आहेत. संमेलनाचे उदघाटन बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. नरेंद्र काळे



करणार आहेत. या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून भावठाण्याच्या सरपंच रुक्मिणी ताई पारीख उपस्थित राहतील. समारोप सत्रात नॅच्युरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेच्या मध्यवर्ती कार्यकारिणीचे सदस्य दगडू लोमटे उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष अनिकेत लोहिया, म.सा. प. आंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ राहुल धाकडे, मार्गदर्शक अमर हबीब, मसापचे सचिव गोरख शेंद्रे आदी या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रतनशील आहेत. भावठाणा येथे २३ व २४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या दुसऱ्या मृदगंध साहित्य संमेलनाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन स्वागताध्यक्ष तथा मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी केले आहे.

साहित्य संमेलनात पहिल्यांदा ह. भ. प. शामसुंदर सोन्नर महाराज यांचे प्रबोधनपर कीर्तन होणार आहे. तसेच बालक-शक्ती, नारी-शक्ती व किसान-शक्ती या तीन सत्रात उपस्थित असलेले लोक बोलणार आहेत व मान्यवर साहित्यिक ऐकणार आहेत. या तीन सत्राचे अध्यक्ष अनुक्रमे विद्यार्थिप्रिय शिक्षिका तिलोत्तमा पतकराव, सामाजिक प्रश्नाच्या अभ्यासक प्रा. डॉ. शैलजा बरूरे व किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब असणार आहेत. 'ग्रामीण भागातील शिक्षण' या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर परिसंवाद होणार आहे. या सत्राचे अध्यक्षस्थान निवृत्त मुख्ताध्यापक भारत सातपुते भूषवणार असून प्रीतम पन्हाळे व राणा अफरीन सहभागी होणार आहेत. दोन कवी संमेलने हे ही या संमेलनाचे आकर्षण असणार आहे. निमंत्रितांच्या कवी संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ कवी राजेश रेवले असणार आहेत. तर खुल्या कवी संमेलनाच्या अध्यक्ष सुजाता भोजने-सरवदे असणार आहेत. या शिवाय संमेलन अध्यक्षांची मुलाखत होणार आहे. गोरख शेंद्रे मुलाखत घेणार आहेत.

# भौतिक प्रगती बरोबर संत विचाराचाही स्वीकार करणे गरजेचे - हभप महादेव महाराज चाकरवाडीकर

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू आहे. या सप्ताहामध्ये दुसऱ्या दिवशीची कीर्तन सेवा ह भ प महादेव महाराज गिरी श्रीक्षेत्र चाकरवाडी यांनी केली. डोईफोडवाडी येथील सप्ताह तीस वर्षे पूर्ण झालेली आहे.या सप्ताहात कीर्तन करत असताना महाराज म्हणाले की, आज भौतिक प्रगती खूप झाली आहे. जगात तंत्रज्ञान खूप वाढलेले आहे. ही प्रगती आणि तंत्रज्ञान पचवायचे असेल तर संत विचाराचा अंगीकार आणि स्वीकार प्रत्येक जीवाने करावा.



याचवेळी काय त्यांचा महिमा वानू वारंवार या निळोबारायांच्या अभंगावर विवेचन करत असताना महाराज म्हणाले की, देशात भाग्यवान आणि पुण्यवान ही महाराष्ट्र भूमी आहे. तिचा आपल्याला अभिमान आणि गौरव असावा. याप्रसंगी गावातील व परिसरातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. अशी माहिती मा सरपंच प्रा. तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करा - गणेश बजगुडे पाटील

बीड ।प्रतिनिधी

मागील आठ दिवसात बीड जिल्ह्यासह तालुक्यातील सर्वच महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली असुन २४ तासांपेक्षा जास्त काळ सततचा मुसळधार पाऊस बीड तालुक्यात झालेला असल्याने शेतीला अक्षरशः तलावाचे स्वरूप आलेले आहे.



शेतकऱ्यांच्या सोयाबीन, मुग, कापुस, बाजरी, तूर यासारख्या अनेक पिकांचे व पशुधनाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. एकतर शेतकरी कर्जबाजारीपणामुळे हवालदिल असताना सणासुदीच्या तोंडावर खरिपाच्या पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे त्यामुळे तत्काळ नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

# मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरात पावसाने पुराचे तांडव ५० म्हशी दगावली तर पिकांचे मोठे नुकसान

## शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद,वंळकी , बामणी,भेडेंगाव,वडगाव, रावणगाव,ईटग्याळ,भासवाडी हसनाळ,अशा सर्व सर्कल मध्ये दि.१७ ऑगस्ट २०२५ मध्य रात्री त्या सुमारास संततधार पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या नदी काठच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून कांहीं शेतकर्यांच्या शेतातील शेड मध्ये बांधलेले जनावरें जागीच दगावली आहेत.नदिकाठच्या मुक्रमाबाद सर्कल मध्ये सर्वात जास्त नुकसान मुक्रमाबाद येथील शंकरप्पा कलप्पा खंकरे,संजय शरणप्पा गोकुळे,नागनाथप्पा कलप्पा खंकरे या शेतकऱ्यांचे झाल्या चे दिसून येते. मुक्रमाबाद गावातील कांहीं लोकांच्या घरात पाणी शिरले होते.गावातील सरपंच प्रतिनिधी बालाजी बोधणे आणि पोलिस साह्क निरीक्षक राजु चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक शंकरराव मोरे ,बीट जमादार आडेकर, पोलिस पाटील व्यंकट सुवर्णकार व त्यांची टीम घेऊन पुरात अडकलेल्या लोकांना काढण्यात यश मिळविले आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्यात आले या पुरात अनेक लोकांचे जीवन आवश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसुन आले. कधी पाऊस नाही ते तर कधी अति पाऊसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असुन त्वरित शासना कडून पंचनामे करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी मुक्रमाबाद व परीसरातील येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

